

मनहिंदोळा
Dreaming of Wings
मना
तनुजा स्मित इनामदार



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# मनहिंदोळा

## Dreaming of wings

लेखिका : मना

{तनुजा समित इनामदार}

# मनहिंदोळा

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# मनहिंदोळा... Dreaming of wings

लेखिका : मना {तनुजा समित इनामदार}.

"आलोक" 2410/क, सोनगीरवाडी, वाई, जिल्हा सातारा.

मोबाईल: ९०४९७४५९९९

इ मेल-inamdarmana@gmail.com

यूट्युब चनल : https://www.youtube.com/channel/UCnlswJnls7Vt4v7qedv7uVA

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : २० नोव्हेंबर २०१९

©esahity Pratishthan®2019

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेचा परिचय



तनुजा समित इनामदार

- १९९५ बी.कॉम मुंबई विद्यापीठ
- २०१५ पासून इ साहित्य प्रतिष्ठान सोबत काम
- २०१६ मध्ये इ साहित्य या साईट साठी “इसापनीती” च्या गोष्टींच एक ऑडीओ इ बुक प्रकाशित.
- “manatli kavita”या नावाचा कवितांचा ब्लॉग २०१४ पासून सुरु.
- दिवाळीअंका साठी लेखन, कविता लिखाण. (पुढच पाऊल, संचार, साहित्य सहयोग, मानस, कुबेर)
- ९० व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात काव्य वाचन २०१७
- काव्यानंद या इ मासिकातून नियामित कविता लिखाण.
- गोवन वार्ता या पेपर साठी नियमित लिखाण.
- विविध काव्य संमेलनात सहभाग.
- ललित कला साहित्य मंच कार्याध्यक्ष पुणे जिल्हा.
- तुझ्या माझ्यातल्या गोष्टी हा स्वरचित कवितांचा प्रोग्रॅम.
- अनेक कविता वेगवेगळ्या कवितांच्या यु ट्यूब चॅनल वर प्रसिद्ध.
- 92 व्या यवतमाळ इथे झालेल्या साहित्य संमेलनात कविता सादरीकरण.

आगामी

काव्यसंग्रह निर्मिती काम सुरू.

स्वरचित कवितांचा यु ट्यूब चॅनल

https://www.youtube.com/channel/UCnIswJnls7Vt4v7qedv7uVA

## प्रस्तावना

कधी लिहायला सुरुवात झाली हे आठवत ही नाही आता खरंतर. पण आधी वाटायचं आपण लिहतो हे स्वतःपुरत फक्त. पण मग मित्र मैत्रिणींना आवडतंय आपण लिहलेलं असं सांगायला लागले आणि थोडी भिड चेपली.मग इथे सोशल मीडिया वर लिहायला लागले.

सोशल मीडियावर मिळणारा प्रतिसाद हा आपण किती मनावर घ्यायचा हे खूप महत्वाचं. कारण आपल्या प्रत्येक पोस्टला छानच म्हटलं जातं. इथे सगळं लाईक आणि कमेंट वर जोखलं जातं. पण काही खरंच जाणकार आपल्या लिस्ट मध्ये असतात आणि त्यांच्या कडून कौतुकाची थाप मिळते आणि लिखाणाचा उत्साह वाढतो.

यातले सगळे लेख हे आपल्या प्रत्येकाच्या आयुष्याजवळ निगडित असणारे प्रसंगातून लिहलेले आहेत. सगळं काही लिहणार्या माणसाच्या आयुष्यातच घडायला हवं असं नाही, तर संवेदनशील मन आजूबाजूला घडणाऱ्या गोष्टी टीप कागद होऊन टिपत असतं. आणि मग ते उतरतं कागदावर. तसंच हे माझं लिखाण.

आई वडील शिक्षक असल्याने आणि सासरी आले ते एका साहित्यिकांच्या घरीच, एस, डी. इनामदार, म्हणजे माझे सासरे. कायमच माझ्या सारख्या नवख्या लिखाण करणारीला ही प्रोत्साहन देणारे.  त्यामुळे घरातूनच कौतुकाची थाप मिळाल्याने हे लिखाण बहरत गेलं.

सुरुवात चारोळी पासून केलेली मी, कविता, ललित, मुक्तछंदात लिहायला लागले.

अनेक वृत्त पत्रात चालू घडामोडीवर लिखाण सुरू आहेच. कविता संग्रह करायचा आहे असा मानस आहे.

त्याच सोबत स्वरचित कवितांच्या सादरीकरणाचा संगीतासह असलेला "तुझ्या माझ्यातल्या गोष्टी" हा कार्यक्रम ही या सगळया सोबत सुरू आहे.

अजून खूप काही शिकायचं बाकी आहे या क्षेत्रात. हे माझं पहिलं पुस्तक तुम्ही सर्वांनी वाचून तुमच्या अभिप्रायाच्या प्रतीक्षेत.

इ साहित्य प्रतिष्ठान बरोबर काम केल्या नंतर आपलं स्वतःच पुस्तक तिथेच प्रकाशित व्हावे या सारखा दुसरा मोठा आनंद नाही. इ साहित्यला खुप खूप धन्यवाद.

मना इनामदार



हे तुझे पुस्तक

तुलाच अर्पण

मना…


Give your stress
Wings
and let it fly away.
Terri Guillemets



1.

तुझी सवय होण्या आधीच

आत्ताच्या आत्ता मला बोलायचं आहे तुझ्याशी खूप आठवण येतेय म्हणून, अशी अनिवार इच्छा मनात दाटून येण्याआधीच

हा सगळा भावनांचा पसारा आवरायला हवा रे.

पण मग ती विरहाची वेदना भूल पाडते, खोटे राग रुसवे, लुटुपुटूची भांडणं, त्या वेळी हवी हवीशी वाटतात. मग तुझं समजून काढणं सगळं सगळं जसं स्वप्नात पाहिलेलं असतं तसंच, आणि मग गुंतत राहतो पाय गुंत्यात.

प्रेमात पडावं की पडू नये असे ऑपशन देतच नाही प्रेम.

गुंता वाढत गेला की कळतं प्रेमातच पडलो आहोत आपण हे.

प्रेमाच्या आणि मैत्रीच्या अंधुक सीमारेषेवरून चालताना दमछाक होते दोघांची, मैत्री मैत्री म्हटलं तरी ओढ असतेच एकमेकांच्या सोबतीची, सहवासाची, सहवास म्हणजे शारीरिक समागमच असा अर्थ अपेक्षित नाहीच इथे, पण तू समजावताना, हलकेच थोपटलेला हात, किंवा कपाळावर मायेने केलेला तूझ्या ओठांचा स्पर्श, हे त्या त्या क्षणी हवंस वाटत.

कारण तो स्पर्श एका पुरुषाचा किंवा स्त्री चा नसतो, फक्त माणसाने माणसाला केलेला स्पर्श असतो तो.

त्यात ना वासना असते ना कसली अभिलाषा.

हे असंच नातं तर अपेक्षित असतं प्रत्येक स्त्रीला मित्राकडून. कृष्ण म्हणून एक मित्र आयुष्यात असावा.

2.

पहाटे पहाटे हलक्याश्या गारव्यात तुझ्या मिठीत शिरताना जाणवतं तू उंच उशी घेतोस त्यामुळे तुझ्या छातीवर डोकं ठेऊन झोपताना मान थोडी नाही म्हटलं तरी अवघडतेच.

मी थोडाच वेळ झोपते तुझ्या छातीवर डोकं ठेऊन,

पण मग विचार आला तू ही माझ्या हातावर डोकं ठेऊन झोपतोस तेव्हा तुला ही उंची मॅच होत नाहीच, तरीही त्या मिठीत कुठेही अवघडलेपण जाणवत नाही, किंवा ती सैलही होत नाही, कारण हे सगळं एकमेकांच्या प्रेमात असल्याने या अशा कमी जास्त गोष्टी ॲडजस्ट करून आयुष्य जगण्यात मजा आहे.

एकमेकांच्या किती तरी गोष्टीत हे असं उंची ॲडजस्ट करावीच लागते नाही.... पण मनानी एकरूप झालं की या गोष्टी अगदी मामुली वाटतात. खरं ना??



3.

काही सल सलत राहतात कायम, कधी कमी कधी जास्त, पण बोच करत राहतात कायम, विसरू देत नाहीत ती सल.

मग वाटत पाऊस आला की कदाचित हा सल वाहून जाईल त्याच्या सोबत, म्हणून भर पावसात बाहेर पडावं, छत्री विसरलो आहोत असं नाटक करत, त्या पावसाच्या सरी मध्ये चिंब भिजव, आणि त्या पावसाचं पाणी, ती सर मना पर्यंत पोचवी याची वाट बघावी, पण मग हा सल अधिकच ठसठसायला लागतो, कारण पाऊस म्हणजे प्रेम, पाऊस म्हणजे तू, पाऊस म्हणजे मी, आणि पाऊस म्हणजे आपण, हे सगळं सगळं आठवतं आणि छोटीशी बोच आता भळभळती जखम होऊ पाहते, त्या आधी मला पावसातून बाहेर पडावं लागतं. आणि त्यावेळी जाणवत की हा सल ना डोळ्यातलं पाणी वाहून नेऊ शकतो, ना पावसाच्या झिम्माड धारा. त्याला सोबत घेऊनच स्वतःला हे असं कायम कोर्टाच्या दारात उभं ठेऊन जगायचं आहे. कारण चूक तू होतास की मी हा न्याय करण्यासाठी देखील तू थांबला नाहीस, पावसाच्या भरलेल्या ढगाचा काळा रंग डोळ्यात ठेऊन, आलेल्या वाऱ्या सोबत काहीही विचार न करता निघून ही गेलास.

काही सल असेच जन्माचे सोबती होऊन राहतात.



4.

दूर का झालो याचं कारण शोधुया का रे? कदाचित त्यातूनच संवाद होईल आपल्यात, आणि आपण कडी कुलूप लावून बंद केलेली मनाची दारं कदाचित बाहेरून आलेल्या हव्याहव्याश्या वाटणाऱ्या झुळुकेनी किलकिली तरी होतील.

एकत्र पुन्हा यायचं की नाही हे त्या नंतर ठरवूया. पण हे असं तुटलेल्या अवस्थेत राहणं कठीण वाटतंय रे. आपण आधी बोलूया अगदी हवा पाणी, निसर्ग, काहीही, जे प्रेमात असताना कधी बोललोच नाही असे विषय, अगदी अनोळखी होऊन बोलू, पण बोलू. शब्दांचा पूल बांधायला तर सुरू करू.. तो पक्का होईल की कोसळेल ते आताच कसं कळणार ना? मैत्री करूया का फक्त एकदा, मी तुला आवडत होते, प्रेमात होते हे काही काळ विसरूया. फक्त मित्र होऊन बघ माझा. मैत्र झालं तर एकमेकांचे त्रास पटकन समजून घेऊ शकू आपण, प्रेमात प्रेम असतं फक्त हक्क अधिकार, मान, सगळं येत,मैत्रीत फक्त understanding असतं. म्हणून म्हणते मैत्र होऊ आधी, कदाचित हरवलेला सूर गवसेल पुन्हा आपल्याला आणि एक आपलं दोघंच मिळून सुंदर गाणं छेडलं जाईल. उम्मीद पे दुनिया कायम है, ऐकलं आहेस ना, माझा हा एक प्रयत्न दोघंच ही आयुष्य नरक होण्यापासून वाचण्यासाठी. कारण मी आजही तेवढंच प्रेम करते तुझ्यावर आणि तू देखील माझ्यावर हे आपल्याला पक्क माहीत आहे.

पहिला डाव भुताचा म्हणून सोडून देऊया ना, एक नवीन सुरवात करून पाहायला हरकत नाही. आणि ती करायलाच हवी.



5.

कधी कधी नकोच वाटत संवाद साधणं, स्वतःशी स्वतःला, किंवा आणखी कुणा जवळ ही.

हवा असतो फक्त एकांत आणि एकटेपण, हो, बरोबर वाचलं आहे तुम्ही, एकटेपण…

अशा वेळी मग आतून येणारे कढ,मग ते दुःखाचे असोत की सुखाचे, एकट्याने उपभोगायचे असतात. उपभोगायचे नाही, भोगायचे असतात. फक्त दुःखच भोगायची नसतात, काही सुखं देखील भोगूनच संपवावी लागतात. जसं की आठवणी, आठवणी नेहमीच ग्रे कलरच्या वाटतात मला, आठवतात म्हणून सुख, आणि आता त्या क्षणांच्या आठवणी झाल्यात याचं दुःख, म्हणून म्हटलं काही सुख देखील भोगावी लागतात.

आणि हे असे ग्रे क्षण अनुभवताना मला नकोच असतं कुणी सोबत, माझी मी ही नको असते मला सोबत. बस माझं मन आणि ते क्षण, हा वेळ त्याचा असतो. तो त्यांना द्यायला हवा. बाकी कशा कशाचा अडथळा नको.



6.

आयुष्य खूपच घाई गडबडीच झालं आहे, हे अचानक जाणवलं आज. आता तुझे का? कसं? हे प्रश्न येतीलच ओघानी.

आज कॉफी प्यावी असं वाटून गेलं क्षणभर, पण कॉफी प्यायची तर जवळ निवांत वेळ हवा, वेळ हवी ती संध्याकाळची, बाहेर रखरखीत ऊन असलं तरी डोळ्यात प्रेमाचा रिमझीमता पाऊस हवा, आणि हे सगळं हवं असेल तर सोबत तूच हवास.  नेमकं तिथेच अडतं सगळं,

आणि तेव्हा आठवत राहते, अनेक वेळा सोबत प्यायलेल्या कॉफीची चव, कधी कडू कधी मिट्ट गोड, कधी अगदीच बेचव, आपल्या दोघांच्या मूड वर तिची चव ठरायची बहुदा.पण सोबत असायचो आपण त्यामुळे ती कोणत्याही चवीची कॉफी छानच वाटायची, हे सगळं सगळं आठवत आणि मग कॉफी प्यायची इच्छा एकदम नाहीशी होते.

आजकाल तुला वेळ नाही, डोळ्यात प्रेमाचा पाऊस नाही, बाहेर आणि आत फक्त ऊन.. आणि होणारी जीवाची काहिली. कॉफी म्हणजे स्वप्न, असं झालं आहे हल्ली.



7.

काहीच नको अश्या मनस्थितीमध्ये असताना

नेमका तू, म्हणजे भूतकाळ समोर येऊन उभा राहतोस

आणि मग सुरू होतात माझे झोके, वर्तमानातून भूतकाळात आणि परत भूतकाळातून वर्तमानात,

काही वेळा सुखावतोस आणि काही वेळा दुखवतोस ही तू.

पण शेवटी माझाच तर असतोस तू. तुला मागे सोडून आले असले तरी जे काही क्षण जो काही काळ तुझ्या सोबत मी जगले असते, तो कसा विसरणार? तो मनाच्या एका कप्प्यात कुलूपबंद करून किल्ली समुद्रात फेकून दिली असली तरी कधी तरी तू आतून धडका मारतोस आणि बाहेर येतोसच. मी शांतपणे तुला पाहते, आपले एकत्र क्षण परत जगते, तू सांगतोस माझ्या चुका, आणि काही योग्य निर्णय ही, आणि मग तू ही मला भेटून परत त्या बंद कप्प्यात जाऊन बसतोस, जाताना हळूच म्हणतोस " कधी तरी आपणहून बोलवत जा ना ग मला"

आणि मी मनातच म्हणते," तू दूर कुठे आहेस, तू माझाच राहावंसं म्हणून तर आत बंद करून ठेवलं आहे तुला."



8.

कालच धुकं आज कुठल्या कुठे पळून गेलं आणि आज त्याची जागा थंडीच्या गारव्याने घेतलीय. प्रत्येक ऋतू मधला गारवा वेगळा. पावसाळ्यातला गारवा आणि थंडीतला गारवा, तो फरक मनाला आणि शरीराला बरोबर जाणवतो. आजचा गारवा दिवाळीची आठवण करून देणारा. वाऱ्या सोबत येणार तो रानफुलांचा सुगंध त्या ओल्या गवताचा वास मला गावाची आठवण करून देत होता. आणि मग मन थेट बालपणात जाऊन पोचल. लहानपणीची दिवाळी आठवली. आता नाही तशी मजा दिवाळीत.

घराच्या साफसफाई पासून सुरुवात असायची या दिवाळीच्या तयारीला. आई हि नोकरी करत असल्याने शनिवार आणि रविवार हे दीड दिवसाचं या कामाला मिळत असे. घर झाडणी हे मुख्य काम. कोकणातलं कौलारू घर असल्यामुळे हे काम किमान 2/3 वेळा तरी वर्षातून करावाच लागे. कामाला माणसं बोलावलेली असली तरी हे एक सामूहिक श्रमदानच असे. आम्ही लहान मुलं हि यथाशक्ती यात डोक्याला कापड बांधून मदत करत असू.

मी लहान असताना तरी दिवाळीचा फराळ हा दिवाळीतच होत असे. म्हणजे आता सारखं सगळे पदार्थ 12 महिने मिळत नसत. खाल्ले जात नसत. त्यामुळे त्या फराळाचं कौतुक होत. दिवाळीचा फराळ हे मुख्य आकर्षण असलेल्या फराळाची मग आई हळू हळू तयारी करत असे. भाजणी भाजणे, पोहे वाळवणे, तांदूळ धुवून वाळत घालणे, बेसनाच्या लाडवासाठी जाडसर बेसन दळण्यासाठी डाळ वाळत घालणे. करंजीसाठी खोबर खिसुन ठेवणे. ती नोकरी करते म्हणून तिला या कामातून अजिबातच सूट नव्हती. ती हि तिचा शाळेचा व्याप सांभाळून आनंदाने सगळं करायची.

बेसनाच्या लाडूच बेसन आणि भाजणी हे घरीच जात्यावर दळल जायचं, त्या वेळी भाजणीच्या त्या खमंग वासाने घर भरून जायचं. आणि मग हि सगळी बेसिक तयारी झाली. कि मुख्य काम दिवाळीच्या आठ दिवस आधी सुरु व्हायचं. शेजारच्या काकू मावश्या सगळ्यांचं प्लॅनिंग सुरु व्हायचं. आज माझ्या चकल्या करू उद्या तुझ्या करंज्या करू. एक मेकींना मदत करत गप्पा मारत पाच पायलीच्या डब्यात चकल्या कारंज्यानी भरून जात. आता सारखं एक किलो आणून करून गावात पुरलं नसत.

प्रत्यक्ष दिवाळीच्या दिवशी सकाळी लवकर कोण उठतो याची चढाओढ असे. फारच थंडी असायची तेव्हा. 4.30 ळ उबदार पांघरूणातून बाहेर यायचा अगदी जीवावर यायचं. पण खूप साऱ्या सडक भरून पणत्या लावण्याचं, रांगोळी काढण्याचं अमिश समोर असे. त्यामुळे मनातला तो उत्साह त्या कडाक्याच्या थंडीवर मत करून आम्हाला पांघरूण बाहेर काढत असे. मग उटणं लावून आई छान न्हाऊ घालत असे. सगळ्यांचं आवरलं कि देवाची पूजा झाली, कि नारायणाच्या देवळात सगळ्या मैत्रिणी जायचं हा ठरलेला नियम. त्यासाठी नवीन कपडे आणले असले तरी साडी नेसायची असे आम्हाला. मग कोणती नेसायची म्हणून आई च्या साड्यांकडे मोर्चा वळे. खूप वेळानी एक साडी ठरे आणि मग सगळ्या जणी देवळात जात असू. नारायणाच्या देवळात जाताना दोन्ही बाजूने भाताची शेत भाताच्या लोम्ब्यानि भरून गेलेली असत. त्याचा एक प्रकारचा विशिष्ठ वास छान वाटे.

देवळातून घरी आलं.कि फराळाचा प्रोग्रॅम असे. कामाला येणारी माणसं,  आमच खोताच घर, त्यामुळे दिवाळीच्या फराळ करायला, घरी फराळ घेऊन जायला खूप लोक येत. त्या सगळ्या बरोबर मग फराळ होत असे. त्या नंतर चे चार पाच दिवस गावात एक मेकांकडे फराळ करायला जाण्याचा प्रोग्रॅम असे. जसे प्रत्येक स्त्री चा स्वभाव निराळा तस प्रत्येकीच्या हाताची चव वेगळी. प्रत्येकीची पदार्थाची खासियत असे. कुणाचा चिवडा सुंदर, कुणाची चकली रेखीव, कुणाचे लाडू अप्रतिम, कुणाचे अनारसे.

बाबा आणि त्यांचे मित्र दिवाळीच्या दिवशी सकाळी पत्ते खेळायला बसत ते कधी कधी संध्याकाळ  पर्यंत सुरु असे.

किती तरी आठवणी. बालपणीचा काळ सुखाचा. मी आधी म्हटलं तस आमचा घर मुख्य रस्त्या पासून थोडं खाली होत. त्यामुळे पायऱ्या उतरून खाली यावं लागे. त्या सगळ्या पायर्यांवर दोन्ही बाजूने संध्याकाळी पणत्या लावणं हे एक चॅलेंजिंग काम असे. चॅलेंजिंग अशासाठी कि दिवसभर वाऱ्याने एक पान जरी हललं नसलं तरी नेमका पणत्या लावताना वारा हजर असे. मग आमची तारांबळ उडे. पण त्या सगळ्या पणत्या लागल्या कि जे सुंदर दृश्य दिसे त्यांनी मन प्रसन्न होऊन जाई. आजच्या सारखा फोटो काढायची सोय नव्हती तेव्हा पण डोळ्यात जो फोटो साठवला आहे तो अजून जस्संच्या तस्सं आहे..

फटाके खरेदी हा एक जिव्हाळ्याचा विषय असे. बाबांच्या मागे मग माझी भुणभुण सुरु होई. मग बाबा रविवारी दापोलीला घेऊन जात.आणि मोठ्या दोन पिशव्या भरून फेकते घरी येत. मग ते उन्हात ठेवून तापवणे हे काम असे. बाबा एवढे फटाके आणून देत तरी मी



शेजारच्या काकाकडे मला लवंगी फटाके हवेत म्हणून हट्ट करत असे. ते हि प्रेमाने ते देत असत. आता बाबा हि नाहीत आणि ते काका हि काळाच्या पडद्याआड गेले. ती दिवाळीही नाही आणि ती मजाही नाही आता.



9.

काल पासूनच महिला दिनाच्या शुभेच्छा यायला लागल्या. महिला दिन, किती कौतुक ना?  ते पुरुष जे बाईच्या व्यंगावर, तिच्या स्वभावावर, विनोद फॉरवर्ड करण्यात स्वतःला धन्य आणि मोठे मानतात ते ही आज आम्हाला महिला दिनाच्या शुभेच्छा देणार. आज तुमचा दिवस वगैरे म्हणून.

आणि एकमेकांचा दुस्वास करणाऱ्या , समोरचीला आपली प्रतिस्पर्धी मानणाऱ्या आणि स्त्रियांच्यावर होणारे जोक्स स्वतःच फॉरवर्ड करणाऱ्या, आणि त्यातून आमचा सेन्स ऑफ ह्युमर कसा चांगला आहे आम्ही किती पुढारलेल्या आहोत हे दाखवणाऱ्या स्त्रिया ही एकमेकींना शुभेच्छा देणार.. कशाला एक दिवसाचा शो हा? स्त्रियांनी स्त्रियांना मान दिला तर रोजच महिला दिन होईल. ती आज किती नटून आलीय, किंवा ती एकटी राहते ना म्हणजे नक्की हिचा काहीतरी प्रॉब्लेम असणार, हेच गृहीत धरणाऱ्या जास्ती स्त्रियाच असतात. हे केलं नाहीत तरी, महिला दिन साजरा करायची गरज नाही, शुभेच्छा नक्कीच पोचतील प्रत्येक स्त्री ला.

10.

शिमगा

दूरवर कुठे तरी घुंगरांचा आवाज आला की आम्हा लहान मुलांची पळता भुई थोडी व्हायची. या शिमग्याच्या सणा मुळे या म्हणीचा अर्थ अगदी तंतोतंत कळला.

कोकणात गौरी गणपती, आणि शिमगा, दोनच मोठे सण. आणि हेच कोकणच वैशिष्ट्य.



शिमगा म्हटलं की आमचा चाकरमानी सुट्टी टाकून गावाला येणारच. गावदेवीला भेटायला. हा एकच सण ज्या वेळी गावदेवी आमच्या घरी येते. पालखीत बसून वाजत गाजत, सोबत खेळी,(पुरुष स्त्री वेष करून पायात चाळ बांधून, नाचतात, हे नवस बोललेले असतात. की माझा हा नवस पुरा झाला तर अमुक एक वर्ष मी खेळी बनून नाचेन. तर हे खेळी नाचताना त्याला सोबत लोक संगीताची जोड असते, गावातल्या जुन्या लोकानी रचलेली गाणी, त्यांचीच चाल, आणि सोबतीला ढोल. त्या गाण्याच्या तालावर हे खेळी नाचतात. गाणी ही एक एक सुंदर असत, काही संदेश देणारी, काही विनोदी, आणि त्या अस्सल गावरान भाषेत गायलेली, तो जो त्या गाण्याचा ठेका आणि लय असे न तो अजून कानात तसाच साठवलेला आहे. तर खेळी, नकटा पालखी ढोल. हे सर्व फाक पंचमीला देवीच्या देवळातून बाहेर पडतात. आणि होळी पर्यंत देवी गुरवांच्या घरी गावात वस्तीला असते. आमची गाव देवी महामाई (अपभ्रंश म्हाम्माय). तीच मंदिर गावाच्या खूप बाहेर अगदी जंगलात आहे. म्हणजे चालत जायचं तरी अर्धा तास तरी हवाच. जंगलातून रस्ता. तर ही आमची देवी फाक पंचमीला गावात येते. आणि पंचक्रोशीत तिची पालखी फिरते. अनवाणी पालखीचे भोई, आलटून पालटून पालखी खांद्यावर घेत भक्तांच्या भेटीला ही माय जाते. आजूबाजूला पाच गावात ही पालखी फिरयायची, आणि मग शेजारच्या गावातली देवी आणि आमची देवी अशी एका ठराविक दिवशी या पालख्यांची भेट आमच्या पवित्र तामसतीर्थावर होई. खूप खुप छोट्या छोट्या गोष्टीत आनंद होता. गावचे गुरव, आणि गावचे खोत असे या शिंमग्यातले दोन महत्त्वाच्या व्यक्ती. कारण गुरवांच्या वर देवीची सगळी जबाबदारी, आणि खोता कडे देवीच्या ओटी सोबत मिळालेल्या पै पैसा, तांदूळ, सुपारी, नारळ, कापड, वस्तू यांचा सगळा हिशोब. त्याच बरोबर "खोतांनू शिमग्याचा पोस्त द्या." अस हक्काने पोस्त मागायला येणारे गावकरी, याना पोस्त म्हणजे पैसे देऊन आनंदी करून पाठवण्याच एक मोठं काम ही खोतांना करायला लागत. आलटून पालटून दोन चार वर्षांनी आमच्या घरी खोती यायची, आणि मग हा हिशोब ठेवण्याचं काम मी आणि माझी बहिण यांच्यावर असायचं. मजा असायची.

कोकणात शेरणं घालायची एक परंपरा आहे, म्हणजे एका मोकळ्या शेतात सगळं शेत नांगरून कोणालाही न कळता एक नारळ पुरून ठेवतात. देवीची पालखी नाचावली जाते त्या शेतात, आणि जिथे हा नारळ असेल त्या जागी पालखी खूप जड होऊन त्या जागी खाली टेकते. कोणी श्रद्धा म्हणेल कोणी अंधश्रद्धा, पण लहानपणी ते पाहायला खूप भारी वाटायचं. ज्या दिवशी देवी घरी येणार त्या दिवशी आई छान अंगण सारवून रांगोळी घालून स्वागताची तयारी करायची. खूप दूरवर आवाज आला की आम्ही सगळी लहान मूल पालखीच्या दिशेनं जायचो. पण......

आता तुम्हाला वाटेल यात पण कुठुन आला, तर सांगते, सुरुवातीला जी म्हण वापरली त्या मागचा अर्थ समजून देणारा खरा माणूस या पालखी सोबत नाही ना, याची खात्री करूनच आम्ही तिकडे जात असू. तो माणूस म्हणजे #नकटा# एक लाकडी मुखवटा त्यावर लाल लाल गुंज लावलेले डोळे, लाल चुटुक जीभ, अत्यंत भीतीदायक. आणि त्याच ते ठराविक गाणं, " उंबरा खाली खतलाय डुरा, आंघोळी करताना देखलाय मासा र देखलाय मासा. उठा उठा पंतोजी अंघुळी करा हो अंघुळी करा, शेवरी फुलली नि शिमगा आला हो शिमगा आला." हे गाणं आणि त्या बरोबर हातात एक लाकडी तलवार, आणि निळा ड्रेस. कमरेला बांधलेले घुंगरू, त्याच्या प्रत्येक पावला बरोबर ते वाजत. घुंगरू म्हणजे बैलाच्या गळ्यात बांधत तेवढे मोठे असत. तर हा नकटा नावाचा माणूस, हा आमच्या कोकणातील लहान मुलांच्या आयुष्यातला पहिला भीतीदायक माणूस. मी आयुष्यात लहानपणी याच्या एवढी कोणालाच घाबरले नाहीये. तर हा मुलं दिसली की त्यांचा पाठलाग करत असे. घाबरवण्यासाठी. आणि आम्ही जीव तोडून पळत असु. बर शाळा दूर, येता जाताना कुठं ना कुठे हा असायचाच, मग लपत छपत, घर गाठे पर्यंत जीवात जीव नसायचा. आई बाबा म्हणत काय भ्यायच एवढं, माणूस आहे आत. ते आता कळतंय पण तेव्हा तव रूप बघून जाम भीती वाटायची.

दिवस संपला अंधार झाला की मात्र ही भिती नसायची, मग उत्सुकता असायची ती आज खावटी कुणाकडे? खावटी हा स्पेशल शब्द आमच्या कडचा, याचा अर्थ रात्री कुणाच्या घरी जमायच, आणि खाण कुणाकडे आज? शिमग्याचा प्रत्येक दिवस गावात कुणा ना कुणाकडे तरी ही खावटी ठरलेली असे. काही वेळा दिवसच कमी पडत. मग बटाटे वडे, पोहे, इडली, पासून मिसळ, दहिवडा, आणि आमच्या घरी बहुतेक वेळा आई ची स्पेशल गरम मसाला आमटी आणि भात हे ठरलेलं असे. अशी सगळी मजा मजा असे.

या मोठ्यांच्या पालखी बरोबर अगणित छोट्या छोट्या मुलांच्या पालख्या येत. पुठ्यापासून तयार केलेल्या. या प्रत्येकाला चार आणे तरी द्यावेच लागत. आणि त्यांच्या बरोबर येत असे संकासुर. हा संकासुर म्हणजे नकट्याच छोट रूप. लहान मुलं पैसे आणि मजा दोन्हीचा आनंद घेत संकासुर होऊन.

या एका नकट्या मुळे शिमगा कधी सुखाचा गेला नाही. ना ती पुरण पोळी गोड लागली. शिमगा जवळ आला की येते ती फक्त त्याची आठवण.



11.

आम्ही उरी पाहून आलो आणि आमचं रक्त देशप्रेमाची गाणी गायला लागलं. पण थेटर मधून बाहेर पडलो आणि लगेच आपल्या मूळ रूपामध्ये प्रकट झालो, तोंडात भरलेल्या पानांची पिक भर रस्त्यात टाकली. चेहऱ्यावर बेपर्वा भाव ठासून भरलेला. जे जवान सैनिक आमच्यासाठी स्वतःच्या प्राणांची बाजी लावतात, आम्ही त्यांच्यासाठी काळे डीपी ठेवतो, सोशल मीडियावर वांझ संताप व्यक्त करतो, उलटसुलट चर्चा करतो, राजकारण मध्ये आणतो, आणि राजकारणीही त्या वेळी स्वतःची पोळी गरम तव्यावर भाजून घ्यायला पुढे सरसावतात. आम्ही बदला मागतो, आम्ही युद्ध व्हायला हवं असं म्हणतो, पण हे सारं कुणासाठी? आमच्या इच्छा पूर्ण नकोच व्हायला कारण आम्ही काय करतोय आमच्या देशासाठी? आम्ही आहोत का लायक त्या सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान आमच्यासाठी देण्यासाठी. आम्ही, बेकायदा वर्तन करतो, नियम हे मोडण्यासाठीच आहेत, या वर आमचा एवढा विश्वास आहे की ते कधीच पाळले जात नाहीत. प्रत्येक कायदा झाला की त्याची पळवाट आम्ही आधी शोधतो, भ्रष्टाचाराला स्वतःचे काम करून घ्यासाठी खतपाणी घालतो, आणि मग या भारत देशाला नावं ठेऊन तिथेच वाट्टेल तसे वागतो. म्हणून आम्ही लायक नाही, त्या सैनिकांनी आमच्या सुरक्षेसाठी जीव धोक्यात घालायची. आमच्या या वांझ मागण्या इच्छा, बदला घेण्याच्या ह्या फक्त आजच्या पुरत्या आहेत. उद्या सगळं पुन्हा पुर्वी सारखाच सुरू राहील.

इतर बाहेरच्या देशाच अंधानुकरण केलं जातं कित्येक गोष्टी मध्ये, मग त्यांच्या कडे कमीत कमी 2 वर्ष लष्कर सेवा करणे बंधनकारक आहे, यांचं अनुकरण करा ना. कायदाच केला पाहिजे, प्रत्यक्ष बॉर्डर वर हातात बंदूक घेऊन लढणं प्रत्येकाला शक्य होणार नाही, पण त्याच्याशी निगडित असलेल्या गोष्टी आणि प्रशिक्षण प्रत्येक तरुण तरुणीला घेणं बंधनकारक हवं. मग मला एकच मूल असलं तरी ही मी त्याला 2 वर्ष देशाच्या सेवेसाठी पाठवयालच हवं. ज्या मातृभूमीत तुम्ही जन्माला आलात तिचे उतराई कधीच होऊ शकत नाही तुम्ही, पण खारीचा वाटा नक्कीच उचलू शकतो.

सोशल मीडिया वर एसी मध्ये बसून त्यांनी बॉर्डरवर काय करायला हवं हे फुकाचे सल्ले देणं सोपं असत, हे कळेल 2 वर्ष प्रशिक्षण घेऊन सेवेत रुजू झाल की. ते सैनिक किती प्रतिकूल परिस्थितीत आपल्यासाठी घरदार सोडून राहतात, हे कळलं की आपण इथे समाजभान ठेऊन कसं वागलं पाहिजे हे तरी कळेल प्रत्येक नागरिकाला.

लष्करी शिक्षण आणि सेवा या दोन्ही गोष्टी प्रत्येक सज्ञान मुला मुलीला कंपल्सरी करावी हे माझं मत आहे.



12.

डबल इन्कम नो किड्स

का सुरू झाला असेल हा ट्रेंड?

स्त्री मध्ये मुळातच एक मातृत्व लपलेलं असतं, मग तिला मुलं नको असं का वाटत असेल? फक्त मजा करायला पाहिजे या दृष्टिने या कडे पाहायला नको.

आज दोघांनी नोकरी करणे ही गरज आहे, वाढती महागाई, वाढलेल्या आपल्या गरजा, यामुळे नवरा बायको दोघांनी नोकरी करणे आवश्यक आहे. मुलींना आपण खुप शिकवतो माझा मुलगाच आहे म्हणतो, शिक्षण नोकरी, मग स्थिरस्थावर होई पर्यंत लग्न होण्यासाठी मुला मुलीचं वय साधारण 26/27 च्या आसपास जात हल्ली. तो पर्यंत नोकरी मध्ये उच्च पद मिळवण्याची शर्यत सुरू झालेली असते, आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी जीवतोड मेहनत सुरू असते, अशा वेळी लग्न झालं की सासर माहेर संभाळतानाच दमछाक होते या पिढीची. आणि अशा मध्ये मुल झालं की स्त्री ची अधिक ओढाताण होते, मूल होई पर्यंत ठीक पण घरात मूल सांभाळणार कोणी नसत, मग ते 3 /6 महिन्याच आपलं बाळ कुणाच्या तरी हाती सोपवून बाहेर जायचं म्हणजे जीव सगळा बाळाच्या पाशीच, त्या बाळाला ना अंगावर पाजू शकत, त्याच्या भुकेची वेळ झाली की त्या आईचा पान्हा दाटून येतो, मग गोळ्या औषधांनी दूध बंद करायचं, मला क्रूरपणा वाटतो हा. आई झाल्यावर आईपण अनुभवणं सोडाच, बाळाचा विरहच जास्त, त्या बाळाला ना आई हवी तेव्हा भेटते ना बाबा. जेव्हा आईची गरज असते जास्त तेव्हाच आई नसते. त्या आईची बिचारीची मनाची ओढाताण, शारीरिक ओढाताण. नि त्यातून येणार मानसिक अपराधीपणा, डिप्रेशन. पण ज्यांना शक्य आहे बाळ झाल्यावर नोकरी सोडणं, आणि थोडं मोठं झालं की पुन्हा आवश्यक असेल त्यांनी नोकरी करणं त्यानी हा नो किड्स चा अवलंब करू नये, आई होणं हे सुख अनुभवायला हवं प्रत्येक स्त्री ने. ती हक्क आहे निसर्गाने दिलेला.



13.

हळद अजून उतरली ही नव्हती,

भांगात सिंदूर ही नुकताच भरलेला

तुझ्या शौर्याच्या कथा ऐकताना

जीव सुपा एवढा झालेला

तुला कायम हिमाचल पोस्टिंग

म्हणून समुद्राच आकर्षण

फिरायला जायचं लग्ना नंतर

ठिकाण गोव्यासारखं निवडलेलं

लग्नानंतर 2 दिवसात फोन आला

बॉर्डरवर इमर्जन्सी ताबडतोब चला

आज परीक्षा होती, मी सैनिक पत्नी

असल्याचे सिद्ध करण्याची


डोळे जुमानत नव्हते तरी ही तो पुर आतल्या आत परतवून लावण्याची

तुझा एकदाच झालेला स्पर्श, रोज अंगभर पांघरून घेईन असं म्हणालास आणि स्टेशन गाठलंस

आज परत आलास ते तिरंग्यात लपेटून, मला तुला स्पर्श करण्याचं ही भाग्य लाभलं नाही... कारण काहीच उरलं नव्हतं पाहण्या आणि स्पर्शण्यासारखं, जमा केलेलं एक शव होतं ते फक्त.

आता मात्र खरंच वेळ होती मी विरपत्नी असल्याचं दाखवण्याची, आणि त्या षंढ लोकांना मारण्याची.. तुझ्या रक्ताने भरलेला सिंदूर चिरकाल टिकणार आहे आता.. आणि तुला खरी सलामी देण्यासाठी मी तुझ्या जागेवर देश रक्षणासाठी हजर राहणार आहे.

हळद उतरण्याआधीच हे सगळं झालं, तुझी उष्टी हळद या माझ्या जखमा भरू नाही शकणार, पण तू ती हळद होऊन कायम सोबत राहशील.



14.

या इथेच थांबून आपण हातात गुंफलेले हात सोडले होते, काही स्वप्न तुझी काही माझी पूर्ण करण्यासाठी,

स्वप्न सत्यात उतरली सगळी फक्त हातात हात घेऊन ते समोरच वळण पार करायचं राहून गेलं, स्वप्नवत.

आणि आज अचानक मी इथे जुनी आठवणींची फुलपाखरं मोजत असताना तू ही योगायोगाने शेजारी येऊन बसलेला, स्वतःमध्ये मग्न, काहीतरी आठवून हसणारा, आणि आपलं आवडतं गाणं गुणगुणायला लागलास, या परक्या देशात मला माझं जग मिळाल्याचा भास झाला ती सुरावट ऐकून.. मी तुझ्या कडे बघून म्हटलं, तुम्ही भारतीय आहात?

आणि नजरा नजर झाली.. डोळे सगळं काही सांगून गेले. त्या बाकानी ही  बेचैनीच्या अनेक खुणा सांगितल्या आपल्यातल्या आणि शेवटची इच्छा तुझी आणि माझी ही पूर्ण झाली, या समोरच्या वळणाला एकमेकांचा हात हातात घेऊन पार करायचं.. पुढे डेड एन्ड असला तरी.



15. अडजेस्टमेंट, अनुकूल बनविणे

कॉम्प्रेमाईज तडजोड

खरंतर दोन्ही शब्द आपण बरेचदा एकाच अर्थाने वापरतो किंवा त्याचा अर्थ एकच घेतो.

मला वाटतं अडजेस्टमेंट ही परक्या लोकांच्या बाबत केली जाते, नात्याचं म्हणायचं तर. जे आपल्याला जगणं सुसह्य करेल अशा तर्हेने ते अनुकूल बनवण्यासाठी केले जाणारे प्रयत्न हे अडजेस्टमेंट असते.

उदा. अरेंज मॅरेज मध्ये नातं नवीन असताना एकमेकांच्या सवयी वागणं बोलणं हे एकमेकांना नवीन असतं, अशावेळी काही गोष्टी आपण सुवर्णमध्य काढून पुढे सुरू ठेवतो, ती अडजेस्टमेंट. अगदीच पुसट रेषा आहे या दोन शब्दांच्या मध्ये.

कॉम्प्रेमाईज म्हणजे तडजोड.. ही नात्यात अनेकदा केली जाते, कारण तिथे आपलं माणूस आपल्याला दूर जायचा नको असतं. खरतर तडजोड या शब्दाची फोड केली (तड+जोड) म्हणजे जिथे तडा (बारीक चिर भेग) गेलेली आहे किंवा जाईल असं वाटतं, त्या वेळी ते जोडण्यासाठी केलेल्या गोष्टी, त्यात स्वतःचा स्वाभिमान ही बाजूला ठेवणे असो, किंवा एखादी न आवडणारी गोष्टी स्वीकारणे असो. अशा कित्येक तडजोडी केल्या जातात.

Adjustment and compromise

हे दोन शब्द माझ्या नजरेतून



16

तुझी प्रचंड आठवण येणं आणि त्यावर मी तुला लगेच फोन करणं,हे सोल्युशन आहेच तुझ्या आठवणींना शांत करायला.

फोन वर मला आवडणारी सतारची कॉलर ट्यून अजूनही तशीच असणं, तीच ती सवय, अगदी शेवटच्या रिंगला तुझं फोन उचलणं, आणि भारदस्त आवाजात पण मायेने "बोल ग" अस म्हणणं, ते ऐकलं की वाटत माझ्या डोक्यावर हात फिरवून विचारतो आहेस, कशी आहेस?

पण बोलून झालं तरी कधी तरी अस्वस्थता जाणवते, आणि वाटत राहतं काही तरी माझ्या आत अगदी आत मधलं काही तरी हरवल्या सारखं.

मी कॉल करते तू म्हणतोस मला ही फार आठवण येत होती ग तुझी...मी म्हणते का? मी म्हटलं म्हणून सांगतोयस ना हे? तू म्हणतोस नाही ग, माझं स्टेटस बघ आजच.. तुला आवडणारी सगळी फुलं आज स्टेटसला आहेत. आणि मग डोळेच भरून येतात. आतून जोडलं जाणं जे असतं ते हेच असावं. आतून जोडलं गेलेलं तोडलं जात नाही कधी.



17

जगात सर्वात सुंदर दिसणारे स्त्री आणि पुरुष म्हणजे नुकतेच लग्न झालेलं जोडपं,

ती ओढ, ते प्रेम, ती काळजी क्षणोक्षणी दिसत असते कृतीतुन दोघांच्याही.

तिच्या गालावर घामात भिजून ओघळलेल्या पिंजरेचा रंग, हलकेच स्वतःच्या पांढऱ्या शुभ्र रुमालाने पुसताना त्याचा हात त्याच्या ही नकळत रेंगाळतोच गालावर तिच्या.

आणि त्यातच केसांची एखादी बट अवखळपणा करायला खट्याळपणे समोर आली तर वाटच...

तिलाही त्याच्या डोक्यात पडलेल्या अक्षता बरोबर दिसतात, यानेही त्या मुद्दाम काढलेल्या नसतात, पुर्वी तोच एकदा केसात हात फिरवून झटक्यात त्या काढून टाकायचा, आज तिला मात्र तांदुळाचा एक एक दाणा टिपून काढायचा असतो, हलकेच. ती वेळ घेऊन सगळे तांदूळ काढते, आणि चारच अक्षता का टाकल्या डोक्यात गुरुजींनी असं मनातल्या मनात म्हणते. नव्या नवलाईचे ते दिवस फार छान असतात, प्रेमाने भरलेले आणि भारलेले सुद्धा. म्हणून सर्वात सुंदर स्त्री आणि सर्वात देखणा पुरुष त्याच वेळी नवीन लग्न झालेलं असताना दिसतात.

सुखाचा मंत्र- त्यामुळे भांडणं झाली कितीही तरी त्या वेळी हे दिवस आठवा.



18

काही तरी कारण पुरतं आणि संवादच नाहीसा होतो आपल्यातला,

हो ना म्हणजे शब्द सायलेंट मोडला जातात, चेहरा निर्विकार अवस्थेत स्वतःवर वैराग्य ओढून घेतो.

आपली आपली कामं करत असतोच आपण, पण सकाळी बाहेर पडून गेलेली मी, आणि तू ही, थोड्याच वेळात राग शांत झाल्यावर नीट पोचला/पोचली असेल ना ऑफिसला हा विचार डोक्यात येतो. मग व्हाट्सएपच्या लास्ट सिनला काही मिनिटं आधीच लॉग इन दिसलं की हुश्श वाटतं.

दिवस गडबडीत जातो, मान मोडे पर्यन्त ऑफिस मध्ये काम होतं, आणि घरी पोचताच डोळे बोलायला लागतात.

टाळतो आपण दोघेही एकमेकांच्याकडे पाहण्याचं, कारण इगो आड येत असतो. पण मी तुझ्याच आवडीचं काही तरी जेवणात करते, माझ्याकडून भांडण संपल्याचा झेंडा दाखवण्यासाठी, आणि तू ही पदार्थ चाखता क्षणी नेहमीची मस्त दाद देतोस, तुझ्याकडून ही सुला झाल्याची. सकाळच भांडण संध्याकाळी संपायलच हवं, तो सूर्य सुद्धा दिवसभर आग ओकून संध्याकाळ रम्य शांत होतोच, निसर्ग बरच काही सांगत शिकवत असतो आपल्याला.



19

आज आपण होऊ वेगळे पण काही उत्तर देऊन जा,

उद्या सवयीने मी आपल्या दोघांची कॉफी तयार करेन, आणि ट्रे घेऊन नेहमीच्या जागी येऊन बसेन, तू यायची वाट बघत..

माझं जाऊ दे रे, पण तो तुझा आवडता मग तुझ्या दोन्ही हाताच्या बोटांची घट्ट मिठी,तुझ्या  ओठांचा  स्पर्श यांची वाट बघत बसेल, त्याला काय सांगू??

मी सकाळी हरिहरन लावेन, आपलं आवडतं " बॉम्बे" मधलं गाणं लागेल, नेहमी म्हणतो तसं आजही माझं कडवं मी म्हणेन, पण तुझ्या त्या कडव्याला तुझा आवाज येणार नाही, आणि ते कडवं जर सैरभैर झालं, तर त्याला काय सांगू? तेवढं सांगून जा.

शनिवारी संध्याकाळी ठरल्याप्रमाणे ठरल्या ठिकाणी समुद्रावर मी पोचेन, ठरलेल्या दगडावर मी पाण्यात पाय सोडून बसेन, आपल्यातलं मौनही बोलकं असतं हे त्या दगडाला माहीत असतं, तो ते मौन आज मिस करेल, मला ही तो फ़ार काळ एकटीला बसू देणार नाही तिथे, मी नेहमीच्या चाट कॉर्नरला जाईन, ठरलेली एक भेळ दोन चमचे तिथला मुलगा आणून देईल, मी सुरवात करेन एक घास खायला, तुझा उरलेला चमचा केविलवाणा होऊन माझ्या कडे बघेल, त्याला काय सांगू??



20.

दोघं कोर्टाच्या समुपदेशन रूम मध्ये

एकमेकांच्या सोबत शेजारी,

गेले अनेक दिवस वेगळं होण्याची शारीरिक आणि मानसिक तयारी करणारे,

मुद्दा कुणी मांडला वेगळं होण्याचा, हा प्रश्न महत्वाचा नव्हताच,

दुसर्याने ही त्यावेळी विरोध का नाही केला हा खरा प्रश्न होता?

तो म्हणाला म्हणून ही पण बॅग घेऊन बाहेर पडली,

काही दिवस सगळया पासून दूर, तिलाही  ही वेळ जरा बरी वाटली,

त्याला ही आठ दिवस शांत शांत वाटलं,

कटकट नाही भांडण नाही, शांत सगळं घर,

हवं तिथे लोळा, हवं ते खा, जाच नाही कसला, ना रुसव्या फुगव्याची भर

ती राहिली वेगळी एकटी, सुरुवातीला अगदी बोलणं ही सोडलं एकमेकांच्या जवळ,

काही दिवसांनी मात्र कारण शोधून मेसेजला केला जवळ,

मग वेळ नाही मला मेसेज मेसेज खेळायला म्हणत फोन करून कामाचं काय ते बोल

आवाज एकमेकांचा ऐकून मन सांभाळू शकत नसे तोल

आठवायच्या त्यालाही तिच्या सगळ्या चांगल्या गोष्टी,

तीही तेच करायची जुने हळवे क्षण परत परत जगायची,

बोलताना यायचा उर भरून दोघांचा.

एक सही खरंच वेगळं करू शकते का हो दोघांना??



21

नारी शक्ती चा जागर, या विषयावर खूप कर्तृत्ववान महिलांच्या बद्दल सगळेच लिहत आहेत, मला त्यांचा आदर आहेच. कौतुक आणि अभिमान ही आहे, पण मला लिहावंसं वाटलं, ते एकल पालक असलेल्या स्त्रियांच्या बद्दल.

माझ्या पाहण्यात किती तरी अश्या स्त्रिया आहेत, ज्यांना कुणाचा पार्टनर गेल्यामुळे एकटं राहावं लागलं, काही जणी तर संसार या गोष्टीचा शॉक बसावा अशा परिस्थितीतुन बाहेर पडून मुलांना सांभाळत सगळं घर सांभाळत आहेत, कारणं वेगवेगळी असतील प्रत्यकीची, पण समाजात जगताना त्याच सगळ्या समान गोष्टींना तोंड द्यावं लागतं त्यांना.

मुळात एकटी स्त्री आणि त्यात तरुण, म्हणजे समाज नीट जगूच देत नाही. तुम्ही एकट्या आहात म्हणजे जणू सगळ्याना उपलब्ध आहात अशीच धारणा असते. त्यामुळे हा त्रास भयंकर असतो. त्यात मूल लहान असेल तर, त्याच आजारपण, त्याची शाळा, त्याचे मूड सगळं सगळं एकटीने हँडल करावं लागतं, इथे मुलं आजारी झाली की आम्हाला नवरा, मित्र सोबत असला धीर द्यायला तरी ही जीवाची किती घालमेल होते. या खऱ्या दुर्गा मानते मी, कोणत्याही परिस्थितीत स्वतःला स्ट्रॉंग ठेवतात या. सोपं असेल का हो हे एवढं? नक्कीच नाही. छोट्या छोट्या गोष्टीत ही कुणाचा तरी कधी तरी खूप आधार हवा असतो आपल्याला, या मात्र सगळं नीट सांभाळून, मनात किती त्रास असला तरी चेहरा मात्र छान हसरा ठेऊन जगाला सामोऱ्या जात असतात.

नातेवाईक ही किती उपयोगी पडतात हे आपल्या प्रत्येकालच खूप छान माहीत आहे. रक्ताची नाती ही अशा वेळी पाठ फिरवतात. जगण्याचं बळ त्यांच्याकडून मिळत मला, अनेक संकटांना तोंड देत या लढत असतात, मानसिक शारीरिक आणि आर्थिक ही लढाई यांची यांनाच लढाईची असते.

मी एवढंच म्हणेन, ती एकटी राहते म्हणजे तीच चुकीची असेल हा समज आधी दूर सारा. कारण तिनी एकटी राहणं स्वीकारलं आहे, त्याच्या आधी तिनी कोणत्या कोणत्या अग्निदिव्या पार करून तिला या निर्णया पर्यंत पोचवं लागलं आहे, याची सुखी संसारात राहून आपण कल्पना ही करू शकत नाही.

माझा सलाम आहे अशा सगळ्या स्त्रियांना. खरच माझ्या सगळ्या एकल पालकत्व निभावणार्या मैत्रिणींनो मला अभिमान आहे तुमचा आणि आदर ही.



22

या देवी सर्व भुतेशु....

नवरात्रीचा उत्सव खूप जोरात सुरू आहे सगळीकडे.. स्त्रिया रोज ठरलेल्या रंगाचे कपडे घालतात, छान छान फोटो काढतात. रोजच्या रुटीन लाईफ मधला हा थोडासा विरंगुळा.. त्यावरही टीका करणारे आहेतच. स्त्रियांच्या वर टीका करणं हे नेहमीच झालं आहे.. आता परवाच एका मंदिराने ठरवलं की हा हा असा पेहराव असेल तरच मंदिरात प्रवेश मिळेल.. काय हे? पुरुषांना आहे का असा ड्रेस कोड, धोतर नेसुनच प्रवेश मिळेल असा? कुठे कुठे बंधन घालणार तुम्ही? आणि का? पूर्वी एक छान म्हण होती, जैसा देस वैसा भेस.. जिथे जाल तिथल्या सारखा पेहेराव करा..कारण तिथल्या वातावरणा नुसार ते कपडे असतात. थंड हवेच्या ठिकाणी अर्धे मुर्धे स्टाईलचे कपडे घातले तर थंडीने के होईल आपलं? एखाद्या पेशंटला भेटायला जाताना एकदम चकचकीत, नटून थटून भडक रंगाचे कपडे घालून तुम्ही हॉस्पिटलमध्ये गेलात, तर कस वाटेल? त्या मुळे स्त्रियांनी ही वेळ ठिकाण याचा विचार करून, योग्य कपडे घालावेत. पण हा कायदा म्हणून नको. एखादी स्त्री कामावर शर्ट पॅन्ट घालून जात असेल किंवा स्कर्ट घालून जात असेल, आणि तिला मंदिरात जायचं आहे, तर इच्छा असूनही या हेच कपडे घालून या अशा फतव्या मूळे तीला दर्शन घेता येणार नाही. देवाला कोणत्या कपड्यात नमस्कार करता हे महत्वाचे की मनातून किती श्रद्धेने त्याच्या पुढे हात जोडता हे महत्वाचे? आपली परंपरा आहे नऊवारी साडी, आता ती हळूहळू कुठे तरी ट्रॅडिशनल डे पुरती उरली, पण पाचवारी साडी अजून आवर्जून नेसली जाते. माझ्या मागची पिढी आणि माझी पिढी अजून घरात काही कार्य असेल, देवाचं काही असेल तर साडी नसते. माझी पुढची पिढी पंजाबी ड्रेस लेहेंगा चोली आवडीने घालते. जशी जशी प्रगती होईल तसं तस हे बदलत जाणार हे मान्य करायला हवं. जे सोयीचं तेच वापरलं जातं. त्या मुळे नका लादू कायदे, आणि नका काढू हे असे न पटणारे फतवे. आम्ही स्त्रिया देखील कुठे काय घालून जावं याचा नक्की विचार करू.



23.

काही गोष्टी हादरवून सोडतात आपल्याला. तशीच एक घटना ही.. कारण??? अज्ञात... हे लिहताना ही मन धडधडतय... प्रचंड अस्वस्थता .... मी आज पर्यंत तिला भेटलेले नाही, पण एक आई म्हणून तिची अवस्था मला कल्पनेत ही सहन होत नाहीये, तिथे तिची काय अवस्था असेल?

मुलं एवढी कमजोर का होतायत? किंवा त्यांचा इगो एवढा मोठा का होतोय??? का आयुष्य संपवून टाकावं, आणि स्वतःचा जीव स्वतःच्या हाताने संपवाव हे डेरिंग येत कुठून या एवढ्याश्या मुलांच्यात? किती जपतो रे आम्ही तुम्हाला... किती प्रेम माया,कुठे कमी पडतो आम्ही?

मी आई म्हणून 9 महिने पोटात वाढवते तुम्हाला, किती किती त्रास होतो 9 महिने, पण आपला अंश आपल्या पोटात आहे याचं आनंदात ते सगळे त्रास सहन करत तुमच्या जन्माच्या वेळी माझा पुनर्जन्म होऊन एक नवा जीव जन्माला घालते. आणि मग सगळं माझं जग तुमच्यात सामावलेलं असतं. दुसर जगच नसत.. अगदी किती ही मोठे झालात तरीही. जीव तुटत असतोच रे तुमच्यासाठी.

तुम्ही मोठे होता, तुमच्या कक्षा रुंदावत, ते पाहून आम्हाला पालक म्हणून छान ही वाटत असतं, तुमचे उडण्यासाठी पंख बळकट करण्याचे आमच्याकडून होणारे प्रयत्न तुम्हाला कधी तरी खटकतात, कधी तरी जाचक ही वाटतात. पण त्यात आमचा काय फायदा असतो

रे पिल्लांनो? तुम्ही या जगात खंबीर होऊन जगावं एवढीच इच्छा असते आमची. एका पिढीच अंतर पार करत आम्ही तुमच्या पिढीच्या बरोबर जमवून घेण्यासाठी आमचा स्पीड वाढवतो, खरंतर दमछाकच होते आमची... पण तुमच्या बरोबरचा संवाद अखंड सुरू रहावा यासाठीचा हा सगळा खटाटोप असतो. तुमची स्वप्न वेगळी, तुमची एम वेगळी, तुम्ही प्रयत्न ही जीव तोडून करत असता तिथे पोचण्यासाठी, पण बाळांनो, काही वेळा काही गोष्टी आयुष्यात वेळ आल्या शिवाय घडत नाहीत रे. अशावेळी निराश होऊन जायचं नाही, वाईट वाटतच रे, एवढे कष्ट एवढी मेहनत, किंवा एखाद्यावर लावलेला एवढा जीव, याचा त्रास होणारच रे. पण म्हणून हे असलं पाऊल नका रे उचलू.. तुम्ही अनेक अनुत्तरित प्रश्न मागे सोडून जाता, आणि आम्ही आयुष्य भर त्या प्रश्नांना सांभाळत, न भरणारी जखम सांभाळत एक एक दिवस लोटत असतो. तुमच्या जाण्या बरोबरच आमचं आयुष्य संपलेलं असतं. मागे पुतळे बनलेलं शरीर आणि भावना गोठलेलं मन बाकी असतं.

नका जाऊ अपयशाने मोडून, नका जाऊ प्रेमभंगाने खचून, कोणाच्या नकाराने नका वाईट वाटून घेऊन आयुष्य खूप खूप सुंदर आहे रे.. आणि असे काही विचार आलेच मनात तर सर्वात आधी येऊन बोला आमच्या बरोबर, मार्ग प्रत्येक गोष्टीतून निघतो रे. आयुष्य संपवण हा पर्याय नाहीये. प्रश्न आहे तिथे उत्तर ही आहेच रे. आपण मिळुन सोडवू ना किती ही अवघड असला प्रश्न तरी. आम्ही तुमचे मित्र बनतोय तुम्ही ही आम्हाला माना ना मित्र, तुमचा. एवढीच विनंती.

पिल्ला जिथे असशील तिथे छान राहा, अजून काय म्हणू.....





24

कृष्ण

कृष्ण म्हटलं की मनात मैत्री, आनंद,भक्कम आधार , खट्याळपणा, हे सगळं उभं राहतं, थोडक्यात सप्तरंग येतात समोर, जे जगण्यासाठी खूप खूप आवश्यक असतात, मीरा सारखी भक्ती, सुदाम्या सारखी मैत्री, पांडवांच्या पाठी असणारा त्याचा भक्कम आधार, द्रौपदीच भर दरबारात लज्जा रक्षण करणारा, तो कृष्णाचं असतो.  म्हणजे कृष्ण म्हणजे वेगळ्या वेगळ्या रुपात आपल्या आयुष्यात असलेली माणसं.

या सगळ्यांना जपलं म्हणजे कृष्ण अखंड आपल्या सोबत असतो.

आजूबाजूला 100 कौरव असतात पण या नात्यात असणारे कृष्ण आपल्याला या 100 कौरवां जवळ लढण्याच बळ देत असतात.



25

रोजची ठरलेली बस,
रोज चढण्याचं आणि उतरण्याचं
ठिकाण ही ठरलेलं,
रोज रोज तेच चेहरे
तेच वास बॉडी स्प्रेचे
सगळंच ओळखीच
अनोळखी चेहऱ्यातल
ओळखीचं हसू
बदल काहीच नाही,
सगळं रोजचच
अचानक एकदिवस
वेगळाच वेडावणारा
बॉडी स्प्रे चा वास बसभर दरवळला
मी वळून मागे पाहिलं
तू माझ्या शेजारच्या  सीट वर बसलेला
मन सुगंधाने भरून गेलेलं
पण डोळे तुला पुन्हा पुन्हा पहायला आतुर
मी चेहऱ्यावर स्टोल बांधलेला
माझा चेहरा तुला दिसणारच नव्हता
पण डोळे....
डोळे दगा देणार अस वाटत होतं.
मी पटकन गॉगल चा आसरा घेतला
या वेळी गॉगल माझा तारणहार वाटला मला.

तू ही गॉगल लावूनच बसलेला होतास

पण तू नक्की माझ्या कडे पाहत नाहीस हे मला माहीत होतं.

मग रोजच सुरू झाला हा सिलसिला

तू, तुझा बॉडी स्प्रे, त्याचा वेडावणार गंध, माझा गॉगल, गणित सगळं पक्क झालं.

आणि एक दिवस अचानक तू माझ्या शेजारीच येऊन बसलास.

मला म्हणालास उगाच त्या गॉगल मधून तुला पाहायचा त्रास नको,

डायरेक्त डोळ्यातच बघूया. मला ही तुझ्या डोळ्यातलं वाचायला आवडेल.

तिथेच रे तिथेच त्या नजरेत अडकून पडलेय मी अजूनही.



26

नजरेत नजर मिसळून गेली की सारखंच दिसत का रे दोघांना??

माझा एक वेडगळ प्रश्न..

तू खळखळून हसला होतास

असं कसं एकच दिसेल?

दोन वेगळी माणसं असतात ना ?

त्याचे विचार ते करण्याची पद्धत वेगळं असतं ना? मग सारख कसं दिसेल?

मला तेच म्हणायचं होत, नजरेत नजर मिसळली की प्रेम असलं तरी ते काय पाहतात एकमेकांत हे सेम नसत. तू वेगळंच काही तरी पहात असतोस आणि मी वेगळं काही तरी पाहत असते तुझ्यात..

आणि तिथेच सुरू होते आपण वेगळं होण्याची पाऊल वाट तयार...



27.

तू हा असा मागे येऊन उभा राहात जाऊ नको रे, तुझे उष्ण श्वास मानेवर जाणवतात मला. थंडगार वाऱ्याची गुलाबी झुळूक अंगावर घेत बसलेली असताना, तुझे उबदार श्वास पटकन जाणवतात. मग तुझं हळुवार मिठीत घेणं, केसात हलकेच हात फिरवत बटांशी खेळत बसणं, सगळं सगळं सुरू होत. मी कुठे तरी तंद्रीत काहीतरी सुचण्याच्या जवळ पोचलेली आणि त्याच वेळी तू म्हणतोस, तुला आठवतंय का ग, त्या दिवशी रात्री आपण समुद्रावर फिरत असताना, तू चंद्रा जवळ किती किती बोलली होतीस? त्या वेळी सगळेच होते मित्र मैत्रिणी आजूबाजूला तरी आपण थोडे एकटेच चाललो होतो. तू तुझ्याच तंद्रीत बोलत होतीस त्या चंद्रा जवळ, आणि मी अगदी शांत.... फक्त तुझ्या सोबत चालता येतंय यात सुख मानत निशब्द पावलं टाकत होतो. तू म्हणालीस चंद्राला, "तुझ्या सारखाच हवा मला माझा सखा. दूर असला तरी कायम माझ्या जवळ असणारा, प्रेमाच्या भरती ओहटीत रमणारा. कधी तरी मला वेळ मिळावा म्हणून अमावास्येला गायब होणारा, पण न चुकता दुसऱ्या दिवशी माझ्या आकाशात डोकावणारा..... असं खूप काही काही बोलत होतीस तू... आणि मी त्याच वेळी ठरवलं होतं, तुझा चंद्र होण्याचं. आणि तुझं आकाश माझ्या प्रकाशने उजळून टाकण्याचं.

आता तू म्हणतेस असा मागे येऊन नको उभा राहुस, पण चंद्र असा एकदम समोर येऊन उभा राहतच नाही कधी, कधी ढगा आड, कधी झाडा आड, त्याच सौंदर्य त्याला दुरूनच पाहण्यात असतं ना ग? मी वाट पाहतोय तू मला तुझ्या आकाशात सामावून घेण्याची.



28.

तू स्वप्नात कधीच येत नाहीस

कायम तक्रार असते माझी

पण रोज सकाळी उशाशी

मोगऱ्याची फुलं असतात ताजी

तू स्वप्नात कधीच येत नाहीस...

तू म्हणतोस

रात्रीच्या मिठीत विरघळून जाणारी संध्याकाळ कधी वेगळी असते का ग अशी...

पण रोज तुझ्या सोबत देव दर्शन घेणं

आणि लग्नानंतर पहिल्यांदा तुझ्या बरोबर देवीला जाणं यात जे सुख असतं ना, तसंच वाटत मला हे... म्हणून

तू स्वप्नात कधीच येत नाहीस

कायम तक्रार असते माझी....

संध्याकाळी मी निघालो ग घरी यायला, असा फोन आल्या पासून
ट्रॅफिक मुळे वेळ लागला यायला तुला तर

तुझं घरात पाऊल पडे पर्यंतचा वेळ

जसा काळजीने भरलेला असतो, आणि त्याच वेळी मी काळजी करत असेन हे तुला ट्रॅफिक मध्ये ही जाणवत असतं. यात जे समाधान आहे ना, तसं ....

म्हणून

तू स्वप्नात कधीच येत नाहीस

कायम तक्रार असते माझी

संध्याकाळी केशर उधळणारं आकाश,

निळ्या रंगाला कसं अलगद आपल्यात मिसळून घेत, तसंच


आपण जेल झालोय एकमेकात

तरीही कधीतरी गुलाबी होणार आकाश ही भुरळ घालतच ना तसंच...

म्हणून

तू स्वप्नात कधीच येत नाहीस

कायम तक्रार असते माझी



29

एका अवघड वळणावर तूझी माझी गाठ पडलेली. वळण दोघांनाही घ्यायचं होतं. दोघेही एक एकटे. विसावलो होतो वळणा आधीच्या एका ठिकाणी, जिथून दिसत होतं सुंदर निसर्गाच्या कुशीत पहुडलेलं गाव. तेच गाव जे मी सोडून आले होते.... कदाचित तुझं ही तेच गाव असावं.. कारण तुझ्या नजरेत असलेली आर्द्रता मला ते सांगत होती. कठीण जात होतं इथे उभं राहून ते पाहणं. आणि हे भलं मोठं वळण घेऊन पुढे जाणं. कारण गुंतला होता जीव त्या झाडात, पानांत, फुलात, आणि मुख्य म्हणजे माणसांत.

काही अंतरावर उभे होतो आपण एकमेकांपासून, एवढे ही दूर नव्हतो की, चेहरा काय बोलतोय हे कळू नये,आणि एवढे जवळ ही नव्हतो की डोळे काय बोलतात हे कळावं. सगळी मौनातलीच भाषा. दोन अनोळखी एकाच दिशेने चालले एवढा एकच समान धागा. शेवटी तू विचारलस मला, "का एकट्याच हे अवघड वळण पार करताय?" मी मौनात, तुझ्या सारख्या अनोळखी माणसाला का उत्तर द्यावं? तू बोलणं सुरू ठेवलस....काहीबाही बोलून संवाद वाढवायला पाहात होतास. तुझं बोलताना डोळ्यात बघुन बोलणं, भावलं मला, ते स्वच्छ होते अगदी, नितळ, कुठलेच भाव नव्हते त्यात. एक माणूस दुसऱ्या माणसाजवळ बोलत होता, बस... एवढंच होत. मग मी हळू हळू बोलायला लागले, आता हे आठवत, आणि तेव्हा तू म्हणतोस ना किती शिष्ट वाटत होतीस तू" तेव्हा मलाच हसू येत. त्या वळणावर ना मी तुझी साथ मागितली ना तू माझी साथ हवी म्हणालास, पण तरीही वळण पार करे पर्यंत... अनेकदा सोबत केली आपण एकमेकांना. न सांगता कळायला लागलं, नेमकं काय हवं आहे या क्षणाला. तरीही एकमेकाला स्वातंत्र्य देत आपला आपला रस्ता अगदी छान चालतोय आपण. नातं काहीच नाही तुझ्या माझ्यात, त्या मुळे त्याला नाव ही नाही काही. अनंतयुगं माणूस माणसाला भेटत राहतो, त्यातलेच आपण दोघं. तिमिरातूनी तेजाकडे जाणारे... फक्त दोन माणसं. ही एकच जात, वर्ण,लिंग, भाषा, आपली. माणुसकी.



30

तुझी आणि माझी ओळख झाली, हो ओळख म्हटलं मी, अगदी कुणीतरी हा हा... आणि ही ही... अशी औपचारिक ओळख करून दिली गेली होती आपली.  तेव्हा नव्हतं माहीत तू माझ्यासाठी #सीतेच्या वनवासातील, राघव शेला# होशील.

पण खरंच आयुष्यात गाठी भेटी होतात त्या प्रत्येक भेटी मागे काही तरी कारण हे असतंच. तू आणि मी नकळत प्रेमात पडणार हे विधिलिखित होत. जे तुला किंवा मला माहित नव्हतं. पण हे घडणार होत. अलगद प्रेमाने भुरळ घातलीच आपल्या दोघाना.

आणि तेव्हाच कधी तरी आपण लाँग ड्राइव्ह ला जाताना गाणं ऐकत होतो, #भय इथले संपत नाही#  आणि ते ऐकताना मी तुला विचारलं होत, #सीतेच्या वनवासातील जणू अंगी राघव शेला# याचा अर्थ काय.. तू मुळात मितभाषी पण बोलतोस ते अगदी नेमकं. म्हणाला होतास ते फील करायची गोष्ट आहे, अस सांगून कसं कळेल ग. तुझं तुलाच कळेल. आणि गेल्या कित्येक वर्षातल्या आपल्या सहवासनी मला ते नक्की कळलं आहे. माझ्यासाठी तो शेला तू आहेस.


आपल्या प्रत्येकाच्या आयुष्यात असा शेला असतोच. वेगवेगळ्या रूपात. वेगळ्या नात्यात. पण असतो एवढं खरं. ज्याच्या मूळे आयुष्यात आपण कणखर, निर्धास्त, होऊ शकतो. जपुया हा शेला, सहजा सहजी नाही मिळत तो.



31.

#हुरहूर#

तू अलगद माझ्या रिंग फिंगर मध्ये
तुझ्या प्रेमाच्या अलगद अलवार भावना गुंफल्यास,
आणि मग चंद्राच्या साक्षीने  चांदण्याच्या अंगणात मनभर बरसलास.
पहाटे पहाटे जाग येता ओळखीचा सुगंध खोली भर पसरला,
खूप शोधलं तुला अगदी खिडकी बाहेर ही डोकावलं
पाहाते तर जाई जुई मोगरा
फुलांनी डवरलेले
हीच ती खूण तू येऊन गेल्याची
कधी नाही तो हिरव्या चाफ्यावर ही एक कळी दिसली उमलेली
मग वाटलं आता मात्र पहाट संपूच नये
तुझ्या अस्तित्वावर सूर्याची किरणं पडूच नयेत



32

कालच काहीच नको असतं आपल्याला. शिळं अन्न, काल घातलेले कपडे, वापरला नसला तरी अगदी तोच रुमाल ही नको असतो परत दुसऱ्या दिवशी. तसंच भाव भावनांच ही. काल झालेलं भांडण, वाद , मतभेद, राग, रुसवा, काही काही कॅरी फॉरवर्ड करायला आवडत नाही आपल्याला. दिवस बदलला की विसरून जावं हे सगळं आणि पुढे चालावं असं वाटतं. आपण प्रयत्न ही करतो तसा, जिथे दोन्ही बाजूने हा असा सारखा विचार असतो त्या नात्यात पुन्हा पाटी कोरी करून नवीन काही छान लिहायला सुरुवात ही होते नव्या दिवशी. हे सारं ठीक पण........

हीच अपेक्षा आपण प्रेम या भावनेच्या बाबतीत केली की तिथे सगळं गाडं बिघडतं. जर समोरचा माणूस हे सगळं झालं गेलं विसरू शकतो तर प्रेम हे ही विसरू शकतोच की. तुमचा लाईफ पार्टनर/ मित्र मैत्रिणी, कायम प्रेमातच राहावा असं आपल्याला वाटण अपेक्षा करणं चूक नाही, पण त्यांनी अपेक्षाभंगाच दुःख जास्त पदरी पडत. त्या मुळे ज्या दिवशीच त्या दिवशी. काय वाटत?



33


शब्द.

तुम्ही खूप स्पष्ट बोलता, " मी असंच स्पष्ट बोलते/ बोलतो" माझा स्वभाव आहे हा. हे आणि अशी अनेक वाक्य रोज ऐकतो आपण. कुणी एवढं स्पष्ट बोलत इथे या व्हर्चुअल जगात की समोरचा माणूस दुखावला जातो, हे ही लक्षात घेतलं जातं नाही बोलताना. गोष्ट अगदीच साधी असते, पण शब्द असे टोकदार बोलले जातात की दुसऱ्याला जखमी करतात.

हे फेसबुक काय किंवा व्हाट्सअप काय, आपण इथे शब्द टाईप करतो, पण त्या मागच्या भावना इथे सांगता येत नाहीत, किंवा त्या समोरच्याला कळत नाहीत, ज्या प्रत्यक्ष संवादातून पटकन कळतात. समोरच्या माणसाने हे शब्द विनोदी अर्थाने म्हटलेत की रागात, की अहंकाराने हे नीटस कळत नाही.

आपण, घरातली एखादी व्यक्ती पटकन लागणार असं बोलली तरी सहन नाही करत ते, तिथल्या तिथे टोकतो तिला, हे तर व्हर्चुअल मध्यम. इथे काहीच माणस पूर्वी पासून एकमेकांना ओळखणारी असतात, त्यांच्या बाबतीत असे शब्दांचा गैरसमज होण्याचे प्रकार कमी होतात, पण ज्यांना तुम्ही भेटलेल्या नाही, ज्यांना प्रत्यक्ष पाहिलेलं नाही, अशा एखाद्या व्यक्तीने तुम्हला लागेल असं बोलणं सहन कराल तुम्ही??? आपले मड आपल्या घरातले तरी सांभाळतात का हो? सारखे बदलायला लागले तर? मग इथे कोण घेईल सांभाळून? मी स्वतः इथे असते थोडं रिलॅक्स होण्यासाठी, काही छान वाचावं, लिहलेलं शेअर करावं. त्यात हे असं दुसऱ्याच बोलणं ऐकून घ्याल तुम्ही???

शब्द जपून वापरावा एवढंच कळत मला. आणि मग तुम्ही सॉरी या शब्दाची फुंकर घातलीत तरी बोच कायम राहते जखमेची.



34.

#कर दे मुझे मुझसे ही रिहा#

काल ए आर रहमान यांचं एक गाणं ऐकत होते. खूप छान सुफी गाणं आहे.

स्वतः पासून मला मोकळं कर. अशी देवा कडे प्रार्थना करणारा हिरो गाणं गात असताना त्यातली ही एक ओळ जास्त मनाला भिडते.

मी माझ्यातच एवढं गुंतन पडले आहे की मला त्या पलीकडे काहीच दिसत नाही.  मी म्हणजे मीपण, माझ्या वस्तू , माझी नाती, माझी माणस, सगळंच तर आलं यात.

या सगळ्या सुरक्षित रिंगणात मी मोकळी फिरत असते असं मला वाटत, पण न दिसणाऱ्या मांजाच्या दोऱ्या सारखी अनेक मजबूत बंधन मला काचत असतात. ज्याच्या जखमा मी माझ्या म्हणवणाऱ्या माणसांनाही दाखवू शकत नाही. तरी ती माझी माणस असं मी म्हणत असते.

या सगळ्या मी पणातून मला मोकळं कर अशी विनवणी तो हिरो देवाकडे करत असतो.

पण खरंच असं स्वतःतून स्वतःला मोकळं होता येत? येत ही असेल पण त्यासाठी खूप प्रयत्न करावे लागतील.




35.

रोमान्स

लग्ना नंतर किंवा लग्ना आधी  शारीरिक जवळीक आणि प्रत्यक्ष शरीर संबंध हा सर्वश्रुत असणारा रोमान्स या शब्दाचा अर्थ. बरोबर ना? असाच अर्थ आहे ना या शब्दाचा?

खरंतर वयाच्या प्रत्येक टप्प्यावर बदलते रोमान्सची परिभाषा. तारुण्यात प्रवेश करताना कोणी सौंदर्याची केलेली तारीफ, आपल्या सुंदर हसण्याचं केलेलं कौतुक हि या रोमान्स मध्ये मोडायच. प्रेमात पडणं, एकमेकांचं कौतुक, राग अनुराग, हट्ट, समोरच्यावर टाकलेला आंधळा विश्वास हे देखील त्यातच मोडत. त्या नंतर शरीराशी निगडित रोमान्स येतो. इथेच जास्त रमतो आपण, म्हणजे हे हे म्हणजे रोमान्स असं डोक्यात फिट असताना, मग नवऱ्यानं गजरा आणला नाही किंवा बायकोने कामाच्या दगदगिने रात्री जवळ घ्यायला नकार दिला की आपण म्हणतो आता आमच्यातला रोमान्स संपुनच गेलाय. पण लग्ना नंतर काही वर्षांनी खरंच तेवढी शारीरिक ओढ राहते का? नाही राहत, आणि त्यात चूक काय आहे? कारण किती तरी गोष्टीत आपण गुंतलेले असतो. मुलं, त्यांचं शिक्षण, बाकी आयुष्यतली टेन्शन जी आपण टाळू शकत नाही, लढत असतो आपण या सगळ्या जवळ, त्यात मग शरीर हि थकून जात. त्या मुळे स्वतःला गिल्टी वाटून घेण्याचं कारण नाही.

पण म्हणून रोमान्स संपलेला नसतो. कधीतरी अचानक नवरा म्हणतो किती ग डार्क सर्कल आलेत डोळ्या खाली, किती बर वाटत, आपल्याकडे नवऱ्याचं लक्ष आहे हे बघून, किंवा नवऱ्याची बीपीची गोळी आठवणीने रोज न चुकता देतो आपण, हे काय असतं? रोमांसच असतो. एकमेकांना जपत एकमेकांच्या आवडी लक्षात ठेवून सहचर्य म्हणजे रोमांसच असतो. असं मला वाटत. त्यामुळे आयुष्यातला रोमान्स कधीच संपत नाही. तुम्ही संपला असं म्हणत असला तरी तो सुरूच राहतो फक्त या वयाच्या टप्प्यावर त्याच रूप बदलेल असतं.



36.

#पाऊस/जिंदगी#

समोर हिरवा कंच धुक्यात लपेटलेला डोंगर,

त्या वरून डौलात खाली झेपावणारे अनेक छोटे मोठे धबधबे, रस्त्याच्या कडेलाही हिरव्या रंगाच्या कित्येक सुंदर सुंदर शेड आपल्याला बोलावत असतात. सोबतीला कधी पावसाची भुरभुर, कधी जोरदार बरसणाऱ्या पाऊस धारा. आपल्या शेजारी आपलं प्रिय माणूस, त्याच्या डोळ्यात एक प्रेमाचा जलाशय ओतप्रत भरलेला. बरोबर आपली मोठी समजूतदार मुलं, सगळं अगदी स्वप्नातल्या सारख परफेक्ट चित्र.

रस्त्याच्या एका कडेला विस्तीर्ण जलाशय संथ. तरीही पडणाऱ्या पावसाच्या थेंबाने त्या जलाशयावर उठणारे तरंग, ते थेंब पडल्यावर तयार होणारी अनेक वलय ती किती मोठी किंवा लहान तयार होणार हे पावसाचा थेंब किती जोरात आदळतो पाण्याच्या पृष्ठभागावर या वर अवलंबून असते.

या मनाचं ही असच असतं, आजूबाजूला किती ही सुंदर रम्य हवं हवस वातावरण असेल तरी काही गोष्टी आदळत असतात मनावर येऊन. मग त्या मुळे ना पाऊसाची मजा घेता येते ना आपल्या आवडत्या माणसाच्या सहवासाची.

आदळणाऱ्या गोष्टी तेवढ्याच पटकन तरंग न उठू देता परतवून लावण्याचं कसब ज्या दिवशी आपल्याला जमेल त्या वेळी आपसूक" जिंदगी प्यार का गीत है" हे गाणं ओठी येईलच.



37

# बालपण#गणपती

आमच्या कोकणात गणपती हा सर्वात मोठा सण. गावात ठराविक घरी 5 दिवस गणपती असे, बाकी सगळ्या घरी दिड दिवस गणराजांची प्रतिष्ठापना होत असे. पण गणपती येण्या आधीच जवळ जवळ महिनाभर त्यांच्या स्वागताची तयारी सुरू होई. अगदी माझ्या लहानपणी आमचा गणपती आजीच्या घरी असायचा. आजोबा आजारी असल्याने बाबा पूजा करायला जायचे त्यांच्या बरोबर मी जायचे.  जून घर, ते ही सामायिक, अर्ध्या घरात आमचं घर , अर्ध्या घरात चुलत काका. पूर्वीच्या घरांना कडीपाट असल्याने तसा उजड कमीच असे माजघरात, तर आजीच्या घराच्या माजघरात गणपती असे. समोर आजोबा बेडवर आडवे असत, पण पूजा सुरू आहे हे त्यांना कळत असे. मधेच एखादा प्रश्न विचारत,

आजोबांना पान खूप आवडे, ते सारख तोंडात हवं, ते प्यारलाईज असल्यामुळे त्यांना पान तयार करून द्यावं लागे, मग ते मधेच सांगत तनु मला पान करून दे ग छान. मला ही किती आनंद होई तेव्हा की आजोबांना पान करून द्यायच.

पुढे आजी थकली आणि मग बाप्पा आमच्या घरी यायला लागला, आईची नोकरी, ती सांभाळून ती सगळं साग्रसंगीत करत असे. तयारी 1 महिना आधी पासून सुरू. कोकणातला पाऊस संततधार बरसणारा, पहिला पावसाचा जोर कमी झाला की आमच्या कडे कामाला असणारे अण्णा अंगणात काकडी, भेंडी यांची अळी घालत. मग पाऊस उघडला की श्रावणातल्या एखादा रविवार घर झाडणी होई. अंगणातल्या काकडीला आता पर्यन्त बालकाकड्या यायला सुरुवात झालेली असे. भेंडी ही दिसायला लागलेली असे. आमचं लक्ष त्या छोट्या छोट्या कोवळ्या काकड्यांवर असे. पटकन कुणाचं लक्ष

नसताना एखादी गट्टम होत असे. बाबांचं लक्ष असे आणि त्यांना नेमकी कळे कोणती काकडी गायब झाली आहे. तर घर झाडणी झाली की मग उन्ह येईल तस उकडीच्या पिठाचे तांदूळ धुवून वाळवले जात, मग जात्यावर त्याच छान सरसरीत पीठ दळल जाई. तिथे ही माझी लुडबुड असायची, जात जड असायचं ओढायला कुठे येतंय पण करायची हौस मोठी. त्या जात्याचा खुंटा सारखा निघायचा. कधी कधी तर जात अगदी असहकार पुकारे, मग खुंट्यात नारळाच्या शेंडी चा दोर भिजवुन घाल, नाहीतर कापडाची ओली पट्टी गुंडाळून, एकदाच पीठ दळून होई. आमच्या घरी खूप सजावट नसे, कारण गणपती देवांच्या देव्हाऱ्यातच ठेवला जात असे. त्या मुळे गणपतीच्या डोक्यावरची भाळी तेवढी नारळ, कांगण्या,  कवंडल, काकडी अशा गोष्टीने सजवली जायची.

मग कार्यक्रम असे पत्री आणि दुर्वा जमवणे. आमच्या गावात प्रत्येक १०/१२ घराचं एक भाग त्याला आम्ही वठार म्हणतो, तर वठारातल्या सगळ्या घरात हरतालिका आणि गणपतीची पत्री पुरवणं हे काम त्या वठारातल्या मुलिंच असे. मग ज्याच्या घरी जी पत्री मिळे ती काढून आणून, घरी आणून गणपती आणि हरतालिका यांच्या पत्री वेगवेगळ्या करून, कर्दळीच्या पानात बांधून, ती पोच करणे, आम्हा मुलींचा गणपती आणि हरतालिकेच्या आधीचा दिवस दिवस खूपच बिझी असे. पण ते पत्री जमवण, गौरी आणून देणं, एक वेगळाच आनंद असे, वेगळं सुख असे, ज्याची तुलना कशाही सोबत करता येणार नाही, लहापणीच्या सुखाच्या मधूघटाचा मोठा भाग या अशा छोट्या छोट्या गोष्टींनी अर्ध्यापेक्षा जास्त भरलेला आहे.

शमी, आघाडा, मोगरा, जाई, जुई, शेवंती, नागचाफ, प्राजक्त, बेल, दुर्वा, अजूनही पत्री असे, आता आठवत नाहीत नावं, तेव्हा मात्र तोंडपाठ होती.

गणपतीच्या दिवशीचा जेवणाचा मेनू ठरलेला असायचा जसे मोदक नक्की असायचे तस पडवळ आणि डाळिंब्यांची भाजी, ती पण भरपूर नारळ घातलेली, दारातल्या काकडीच्या अळ्यावरच्या काकडीची कोशिंबीर, चटणी, वरण भात, मोदका सोबत केल्या जाणाऱ्या निवगऱ्या यांच्या वर आमचं मोदका पेक्षा जास्त प्रेम.

दुपारची जेवण आटपली की दुपारी 4 नंतर गणपती बघायला जायची तयारी सुरू होई. गावाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत, ३०/३२ घरातले सगळे गणपती पाहायला निघायचो आम्ही. मग सगळे गणपती बघून घरी येऊन खूप दमायला झालेलं असे . पण रात्री आरतीसाठी सगळे एकमेकांच्या घरी सगळे जात असत, त्यामुळे सगळे मिळून २०/२५ जण तरी आरतीला असत. अमच्याकडे तर बाबा पेटी काढून अंतुकाका तबला, अशी मस्त साग्रसंगीत आरती होई. मग प्रसाद म्हणून काहीतरी वेगळं केलेलं असे. प्रत्येक दिवशी एक कुणाकडे तरी

जागरण ठरलेलं असे, भजन होई, पोहे उपमा, भाजणीचे वडे, असं काही तरी रात्री भजन संपलं की खाणं असे, पण बऱ्याचदा भजन संपण्या आधीच आम्ही झोपेच्या अधीन होत असू ते कळत ही नसे.

दुसरा दिवस ऋषी पंचमी चा, आई सगळी मिक्स भाजी करत असे, त्यासाठी वरीच पीठ जात्यावर दळून घेतलेलं असे, आमच्या घरी ऋषींची भाजी आमच्या एकट्या घरा पुरती कधीच केली गेली नाही, आजूबाजूच्या ५/७ घरात ही भाजी भाकरी आई देत असे, त्या भाजीची चव आजही जिभेवर आहे, मी तशी भाजी केली तरी ती चव माझ्या हाताला येत नाही. त्यात घरच्या अंगणातल्या भाज्या, घरचे नारळ, आणि आई चा हात यातलं काहीच नसत, त्या मुळे ती चव काही येत नाही. गणपती विसर्जनाच्या नंतर आम्ही भावंड बुरोंडी ला मिळणारा पाव पॅटीस आणायला जात असू आणि ते नाही तर मग सागरसावली मध्ये कॉफी प्यायला जात असू.

त्या नंतर गौरी आगमनाचा दिवस, जस पंचगात वेळ असेल त्या प्रमाणे नदी वर जाऊन गौरी घेऊन येणं हे आमचं मुलीचं काम असे, सगळ्या वठाराच्या आणायच्या खड्याच्या गौरी, त्या ही झांजा वाजवत. गौरी आणताना त्यामुळे 2 जणी असल्या तरी एकीने गौरी घ्यायच्या एकीने झांज वाजवायची असं ७/८ फेऱ्या नदीवर घालायच्या प्रत्येक वेळी सुखकर्ता आणि दुर्गे दुर्गट भारी, या दोन आरत्या म्हणायच्या आणि मग पूजा करून गौरी घरी घेऊन यायचं. त्यामुळे या दोन आरत्या एवढे वेळा म्हणून व्हायच्या की पुफहे वर्षभर नुसता नमस्कार ही पुरे देवाला. मग कुठे कुमारिका म्हणून जेवायला बोलावलेलं असे. लहानपणी हे आवडत नाही ते खात नाही असं काही नव्हतं, त्यामुळे कधी अडचण आली नाही. नाना काकांच्या आईच्या हातच घावन घाटल, मुद्दाम ठेऊन द्यायची ती आजी आमच्यासाठी. आणि ते तिच्या हातातच आवडायचं मला.

आता मात्र गाव शब्दशः एकटं झालंय, घरात एक किंवा फार तर 2 माणसं अशी परिस्थिती झालीय. तशी सगळीच सिनियर सिटिझन मंडळी फक्त गावात उरली आहेत. आम्ही अनुभवलेली गावाची मजा या पुढची पिढी अनुभवू शकणार नाही, याच वाईट वाटत, आणि मग माझी पिढी स्वतः ला भाग्यवान समजते.

आता दर गणपतीला गाव तो माहोल सगळं सगळं मिस करते. आणि घरातले गौरी गणपती आनंदात साजरे करते.

39



नाती सांधणारे दुवेच जेव्हा निखळतात,
तेव्हा त्या दुव्याच्या दोन टोकांची नाती
आपसूक जवळ येतात.

नात कुणाच्या मार्फत असलं दोन
माणसात

की गैरसमजाच्या रोगांनी नक्की मरणार.
यात मुद्दाम कुणी काही करत असं नाही, आणि करत नाही असंही नाही. थेट नात ते स्त्री असो पुरुष असो मित्र नातेवाईक, सहकारी, कोणाशीही, अगदी सख्खी नाती असली तरी. संवाद आपला हवा दुसऱ्या मार्फत नकोच.



40

छान पावसाळी हवा, आणि त्यात फुलणाऱ्या जाई जुई. जुईच नाजूक फुल पाहिलं त्याचा सुगंध आला की माझं मन बालपणात पोचत. माझी नलू आई आठवते मला. घराच्या कवाडीवरच्या कमानीवर ऐषारामत पहुडलेला हा जाई चा वेल एवढी फुल द्यायचा की छोटा टोपला भरून जायचा. मग नालुआई त्याचे अगदी बारीक सुईने त्याचे उत्कृष्ट गजरे करी, मी लुडबुड करायला असायचे मध्ये. मला ही गजरा करायचा म्हणून हट्ट ही करायचे. त्यात फुल फुकट ही जायची, पण तिने मला ती फुलं कशी छान सुईमध्ये ओवून सुंदर गजरा करायचा हे शिकवलं. ती हार सुद्धा करायची मोठ्या रामाच्या तसबिरीला. एवढी फुल यायची जुईला. संध्याकाळी त्या अर्ध्या मिटलेल्या कळ्या काढताना मन त्या सुगंधानी भरून जायचं. बेबी ताई मी आणि नालुआई हे फुल काढण्याचं काम करायचो. मी काम कमी करायचे आणि त्या दोघीना त्रास जास्त द्यायचे. माझ्यावर लक्ष ठेवण हे त्यांच्या कामात काम वाढायच. राम बाबा , जया काका, आपल्या आपल्या कामात असत. मग फुल काढून झाली की भूक लागलेली असे, मग दडपे पोह्यांचा कार्यक्रम होई. त्यात दही, ताक लसणीच तिखट, पापड असा सगळा साग्रसंगीत खाण्याचा प्रोग्रॅम होई. मग तो पर्यंत माझी घरी जायची वेळ होई. जया काका खांद्यावर बसवून मला घरी आणून सोडी. मी परत त्याच्या बरोबर नालुआई कडे जाण्यासाठी मागे लागून हट्ट करी. आणि मग मला जया काका पुन्हा नालुआई कडे घेऊन जाई. हे असा आठवड्यातून 2 वेळा तरी होत असेल, पण कधी ही जया काका विदू दादा बेबी ताई नलू आई राम बाबा हे करताना वैतागले नाही. लाडाने कडेवर उचलून माझी स्वारी परत नालुआई कडे घेऊन जात असत.

#बालपणीचा काळ सुखाचा#



41


तुम्ही सिग्नल च्या आधीच्या रस्त्यावरून मेन रोडला लागता. तुम्ही पोचायला आणि सिग्नल सुटायला एकच वेळ येते. वाहनांचा प्रचंड लोंढा जीव घेऊन पळत असतो. पूर्ण रस्ता भरलेला, वाहनाचे आवाज त्यात भर म्हणून त्यांच्या हॉर्नचे ही आवाज. तुम्ही त्यातूनच वाट काढत मुख्य प्रवाहात सामील होता. इथपर्यंतच तुमच्या हातात असतं. कारण पुढे त्या प्रवाहा बरोबरच तुम्हाला तुमचा स्पीड ॲडजेस्ट करावा लागतो. तुम्ही उजवीकडून रस्त्यावर आलाय आणि तुम्हाला डावीकडे जायचं आहे, तर पुढच्या सिग्नल ला मिळेल जागा तेव्हा जाऊ असं म्हटलं तर शक्य होतंच असं नाही . मधून वाट काढत जाण एवढं सोपं नसत. लोकांच्या त्या जाचक नजरा, (कुठून आलीय कुणाला ठाऊक) वगैरे टाईप च्या सोसत वाट काढावी लागते, नाही तर सरळ पुढे जाऊन मिळेल तिथे घुसव लागत.

आयुष्याचं तरी वेगळं काय असतं? एखाद्या नवीन रस्त्यावर वाट काढताना लोकांच्या सेम नजराना समोर जावं लागतच.  काही अगदी जवळची माणसाची त्यात असतात. पण तुम्हाला माहित हवं, विश्वास हवा, की या प्रवाहात वाहत जायचं की आपली दिशा आपण निवडायची ठरवायची. निर्णय आपण घ्यायचा आणि त्याची संपूर्ण जबाबदारी ही, त्याचे भले बुरे परिणाम होतील ते आपले शिक्षक असतात. अशा वेळी माणस कळतात.   चला तर आपली दिशा आपण नक्की करूया



42

मी आज अगदी पक्क ठरवलं होतं आज तुला भेटायचं ते अगदी कोरड्या डोळ्यांनी. हं हं कोरड्या म्हणजे कोणतेच भाव नसलेल्या नाही रे, तर डोळे कोरडे ठेऊन. तू खूप वाट पाहायला लावतोस हे नेहमीच झालंय तुझं, कोणा कोणाकडून कळत असतं .. तू इथपर्यंत पोचला आहेस, काही दिवसात या या ठिकाणी पोचशील, आणि मग मला भेटायला येशील. पण तू कुठे तरी वाटेत रमतोस, कायमचच झालंय हे. वाट बघून माझा जीव अगदी कासावीस झालेला असतो आणि तू मात्र... तुला नसत भान जिथे रमतोस तिथेच रमतोस. मग कोणी तरी ढकलत तुला अरे बाबा तुला पुढचा पल्ला ही गाठायचा आहे बर का... तेव्हा कुठे स्वारी पुढे सरकते. मग 8 दिवस उगाच येतो येतो हवा करत राहणं, वाऱ्यासोबत निरोप पाठवणं, हे असलं करून माझा रुसवा काढण्याचे विविध उपाय करत राहतोस. तो वारा तुझा गंध बरोबर घेऊन येतो आणि त्या गंधानी मी मोहरून येते. किती साठवून घेऊ श्वासात आणि किती नको असं होतं. तू भेटलास की म्हणतोस अग काय हे आता काही महिने राहणारच आहे इथे, किती ग तू वेडी. पण तुला नाही कळणार, वर्षातले हे 4 महिने माझ्यासाठी नवं संजीवनी असतात. मीच नाही इथला प्रत्येक जण तुझ्यासाठी वेडा आहे. तुझा तों पहिला टपोरा थेंब हातावर घेताना किती किती सुख मिळत शब्दात नाही सांगता येत.  कधी तरी रुसतोस कधी तुफान बरसतोस, कधी हळुवार रिमझीमतोस, किती किती रूप तुझी, तुझ्या प्रत्येक रूपावर भाळलेली मी. बरसत राहा असाच.



43

माझ्या नव्या घराच्या गॅलरी मधून

गच्च भरलंय आभाळ काळ्या कुट्ट ढगांनी, जसं तुझ्या माझ्यात भांडण झालं की माझे डोळे भरून येतात. त्या भांडणाच्या काळा पुरते ते काळे ढग मनावर राज्य करता तुझ्या आणि माझ्या. आणि मग तुझ्या एका शब्दाने ही मुसळधार पाऊस सुरू होतो डोळ्यातून, ते रुमालाने नाक पुसताना माझं लाल होणार नाक पाहून नेहमी तू हसतोस आणि त्या एका हसण्याने आलेले काळे ढग कुठल्या कुठे पळून जातात. आणि मग बाहेर कोसळणारा पाऊस आणि आत कोसळणारा पाऊस एकरूप होतो. तुझ्या खांद्यावर डोकं ठेऊन मी बाहेरचा पाऊस पाहते. तू हलकेच माझ्या कपाळावर तुझ्या ओठांनी गोंदण करतोस, आणि रडून लाल झालेल्या नाकाला ओढतोस. पाऊस पडत असताना मला गझल ऐकायला आवडत हे लक्षात ठेवून तू माझ्या आवडीच्या गझल्स ची तयार केलेली सिडी माझ्या नकळत सुरू करतोस, आणि हरिहरन नि गायलेली फुल है चाँद है क्या लगतां है.... ही माझी खूप आवडती गझल लागते. भांडणाचे सूर कधीच सोडलेले असतात आपण आपल्याही नकळत. या बाहेरच्या पावसाची हीच तर गम्मत आहे, तो माझ्या आतला पाऊस थांबवतो आणि तो स्वतःमध्ये मला ओढून घेतो. तुला आवडते तशी स्ट्राँग कॉफी मी तयार करून आणते आणि त्या हरिहरन च्या गझल मध्ये, समोर बरसणाऱ्या जलधारांमध्ये, आणि तुझ्यात मी स्वतःला हरवून बसते. काळे ढग कधी तरी असेही यायला हवेत तुझ्या माझ्या लुटुपुटू च्या भांडणासाठी. नाहीतर आहेच रे समजूतदार पणाचे मुखवटे चढवून रोजच जगणं. अश्या ढगां मुळे कधीतरी आपल्याला एकमेकाला वेळ देता येतो. आणि हा पाऊस एन्जॉय करता येतो.



44

आभाळ सारखच भरून येतंय पण पाऊस मात्र पाठ फिरवतो आहे, काळे ढग दिसले की वाटत आला आपल्याला भेटायला पाऊस. एवढी वाट पाहतोय आपण ते पोचलं त्याच्या पर्यंत.

पण तो हुलकावणी देत राहतो, आणि आपण आशेवर वाट पाहत राहतो, त्याला यायच तेव्हाच तो येतो, आणि कधी ही आला तरी आला ना यातच आपण समाधान मानून खुश राहतो.

हे सगळं फक्त पावसाच्या बाबतीत असतं. आयुष्यात कित्येक गोष्टी वेळे आधीच मिळाव्यात म्हणून किती आटापिटा करतो आपण? साधी तिकिटांची लाईन असो किंवा बस ची वाट पाहणं असो, पटकन कस काम होईल याचीच गडबड असते प्रत्येकाला. वाट पाहणं मान्यच नाही हल्ली. सगळं फास्ट इन्स्टंट हवं आहे.  आठवून पहा बरं तुम्ही तुम्हाला हवी असलेली गोष्ट मिळवण्यासाठी किती प्रयत्न केलेत आणि ती किती दिवसांनी वर्षांनी मिळाली? मला तर खूप गोष्टी आठवतात अशा, जस की आमच्या घरी फोनसाठी नंबर लावला होता, 2 घर सोडून फोन (लँड लाईन) बसला, अगदी थोडं अंतर होत, पण आमचा फोन यायला त्या पुढे 6 महिने गेले. मी अगदी न चुकता त्या फोन च्या ऑफिस ला जाऊन साहेबाना भेटून दर 8 दिवसांनी चौकशी करत असे. अशा अनेक आठवणी.

तर वाट पाहणं हे ही गरजेचं आहे.

काय वाटत मैत्र तुम्हाला??



45

काही जीवघेण्या जखमा आयुष्यभर सोबत करतात

किती ही नको म्हटलं तरी अगदी मुळावर घाव घालतात

क्षमाशील मन हे एक मोठा शाप आहे

हजारो वाईट गोष्टी आठवल्या तरी हे मन समोरच्याची परिस्थिती पाहून द्रवत, मला राग येतो मग स्वतःच्या मनाचा , स्वतःचा.  कुणी आपलं आयुष्य बरबाद करण्याचा प्रयत्न केलेला असतो, कुणी प्रचंड मानसिक आघात, त्रास दिलेला असतो, तरी त्या व्यक्तीच्या पडत्या काळात आपल्या कडे ते माणूस आलं की मन द्रवत.  त्या पडत्या काळातही ते माणूस आपलं चांगलं चिंतत नसतंच, स्वभावा नुसार त्रास देण सुरूच असतं.

क्या करे इस दिल का?



46

अगदी प्रचंड ट्रॅफिक चा पूर असतानाच तू समोर दिसतोस, स्वतःच ते अत्यंत आकर्षक रूप बरोबर माझ्या नजरेत भरेल याची तू पुरेपूर काळजी घेतोस. प्रत्येक सिग्नल ला मी तुला डोळे भरून पाहण्याचा प्रयत्न करत असते. पण तू दूर दिसतोस. मी तेवढ्या ही तुझ्या दिसण्यानी सुखावते, पटकन अंतर पार करून पुढच्या सिग्नल ची वाट पाहते.  आणि मग एका वळणावर तू मला दिसेनासा होतोस, तुला डोळे भरून पाहायचं राहून जात, आता पुन्हा उद्या तू येण्याची वाट पहावी लागणार. आणि पुन्हा तुला पाहण्यासाठी सिग्नल टू सिग्नल अंतर पटपट तोडाव लागणार.

#आजच्या दिसणाऱ्या चंद्रासाठी#



47

किरण कुलकर्णी vs किरण कुलकर्णी नावाचा चित्रपट आज पाहिला त्यात शेवटी त्या हिरोईन च्या तोंडी असलेली काही वाक्य खूप आवडली. आयुष्य डान्स सारख असतं, एक पाऊल पुढे तर कधी एक पाऊल मागे, कधी आनंदाची गिरकी तर कधी सगळं कवेत घेऊन मागे पाहणं.

खरच हे असंच तर असतं आयुष्य. डान्स ला जसा पार्टनर महत्वाचा असतो तसाच आयुष्यात समोर येणाऱ्या त्या त्या क्षणाचा पार्टनर खूप महत्वाचा असतो. तो कशी स्टेप घेतो त्या वर आपली स्टेप अवलंबून असते. तो आपल्या आपल्या स्टेप चा रिदम एकदा जमला की आयुष्य सुंदरच बनत. कधी तरी एखादी अवघड अशी स्टेप येते आयुष्यात, वाटत आता आपली फजिती होणार ही स्टेप जमणार च नाही आपल्याला, पण आपला पार्टनर एवढं सांभाळून घेतो आपल्याला की लोकांना कळतंच नाही की हे आपल्याला येतच नव्हतं. कुठेही तो ताल बिघडू देत नाही. कुठेही आपल्याला जाणवू ही देत नाही, की या या वेळी मी ताल सांभाळला होता. नात्यात हिशोब आले की नात दुरावलेलं असतं किंवा दुरावत असतं. जो पर्यंत मी तुझ्यासाठी हे केलं होतं, किंवा मी तुला अशी मदत केली होती, हे जेव्हा बोललं जातं तेव्हा नात्यातली जादू संपलेली असते. सुरू असतं ते नात वागवण.



48

कुठे तरी दूर जाऊन नवीन स्वप्न बघायचं

आधीच सगळं सगळं मागे सोडून

तिथे या जुन्यात कुठे तरी खोल जीव अडकलेला,

ते हि नव्हतंच माझं हे  माहित असून ही

या प्रत्येक जागेवर काही तरी आठवण आहे माझी

आता नव्या जागेत पुन्हा त्या आठवणी तयार कराव्या लागणार जीव ओतून

पण नव्याला जुन्याची सर येईल का रे?

शेवटी सहवासाने वाटेल त्या नव्या बद्दल हि काही तरी,

हे एकीकडून दुसरीकडे स्थलांतर वाईटच,

मेंदू शरीर आणि हे माझं मन, त्या नव्यात रुळायला किती वेळ घेईल त्यालाच माहित



49

खर सांगायचं तर पाऊसवेडी मी जेवढी तेवढीच समुद्र वेडी सुद्धा आहे. निसर्गातील जे जे भव्य त्या पुढे नतमस्तक होता ते जे काही आनंदच दान माझ्या पदरात टाकत ना त्याला माझा पदर ही अपुरा पडतो, हा हा पदरच म्हटलं मी. मला साडी नेसायला प्रचंड आवडते, अगदी सध्या पद्धतीने. तुला ही मी ड्रेस जीन्स पेक्षा साडीतच जास्त भावते हे नजर सांगून जाते तुझी. तू कधीच मला हे कर असच कर असा फोर्स नाही केलंस किंवा मी ही करत नाही, पण ते न करताच तू जशी मला तुझी फ्रेंच कट आवडते म्हणून आवर्जून ती मेंटेन करतोस तसच आपण मुलांना सोडून आपल्या डेट वर जाताना आवर्जून साडीच नसते.

आपण वाळूत अनवाणी चालताना आपल्या मागे आपल्या पाऊल खुणा तो समुद्र न चुकता स्वतः मध्ये बुडवून टाकतो, सांगत असतो जणू, मागे काय सुटलं ते नका पाहू, पुढे चालत राहा

परवा आपण असेच उधाणलेल्या समुद्राची गाज ऐकायला गेलो. तू छान मोगऱ्याच्या टपोऱ्या कळ्या घेऊन आला होतास. हो गजरा नाही कळ्याचं, मला गजरा घालायला आवडत नाही पण मोगरा फार आवडतो म्हणून कळ्या घेऊन आलास. समुद्राचा बेभान करणारा वारा, सोबतीला हातात हात असलेला तू आणि मोगऱ्याचा मंद धुंद करणारा सुगंध. अशी डेट तर आपली लग्ना आधी ही कधी झाली नव्हती ना.

मौन भांडणा नंतरच फार त्रासदायक असतं, पण प्रेमात असताना, तेच मौन हवं हवस. आणि समुद्रावर गेलं की बोलायचं नसतंच, फक्त त्या लाटांच्या गाजेला कानात साठवायच असतं असं ठरलं आहे आपलं.



50

ते बोन्साय पाहिलं की माझ्या आजूबाजूची किती तरी माणसंच दिसतात मला त्या प्रत्येक बोन्साय मध्ये.

कोणाचा तरी इगो, कोणाचा तरी दबाव, कोणाचं अति प्रेम किंवा कोणाला मिळणारा प्रचंड तिरस्कार

सगळी वाढच खुंटून जाते अशा लोकांची.

कोणतीही गोष्ट अति प्रमाणात झाली की त्रासच होतो त्याचा अगदी प्रेम लाड, माया हे हि अति झालं की त्रास होतो.




51

चंद्र म्हणजे आपलं प्रिय माणूस. प्रियकर. पौर्णिमेचा चंद्र म्हणजे खुप प्रेमात बुडालेला सखा. त्याच्या प्रेमात न्हाऊ घालणारा. चंद्राचं प्रत्येक रूपच प्रिय आहे मला. त्या चंद्रावर अनेक डाग दिसतात आपल्याला. पण तरीही तो प्रिय च आहे मला. कारण तो आहे तसा स्वीकारतो आपण त्याला. त्या चंद्रा वरचे डाग म्हणजे आपल्या या चंद्रातले आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी. पण त्या डागा शिवाय चंद्र जसा उठून दिसत नाही तसाच आपला सखा हि त्याच्या त्या आपल्याला न आवडणाऱ्या गोष्टी शिवाय अपूर्ण असेल कदाचित. मला पौर्णिमेचा चंद्र आवडतोच खूप सर्वांगाने फुललेला. पण बारीक चंद्राची कोर हि तेवढीच आवडते. तो आकाशात दिसला नाही तर ओकबोक वाटत आभाळ. कितीही चांदण्या असल्या तरी. तसंच कीती हि सुखाच्या चांदण्या चा सडा पडला असेल दारी तरी तो नसेल तर सगळं सुन सुन वाटत.© मना



52

माझ्या घरच्या कुंड्यांमध्ये आवडीने वेगवेगळे गुलाब आणि इतर फुलझाडं लावली आहेत. छान फुल येतात प्रत्येक झाड भरभरून फुल देत असतं. पण एक गुलाब मात्र लावल्या पासून कधीच फुलाला नाही आज 3 वर्ष होतील. एकही फुल आलं नाही त्याला. लावला तेव्हा त्याच्या दुसऱ्या फांदीवर कळ्या होत्या. पण लावला आणून आणि त्या नंतर त्या कळ्या देखील न फुलता कोमेजून गेल्या.  असं का? हा विचात रोज त्याला बघताना येतोच मनात. मी न चुकता सगळ्या सोबत पाणी घालते त्याला. जस फुल देणाऱ्या झाडावर मायेने हात फिरवते तसा त्याच्याही पानांना कुरवळते. थंडीत मात्र न चुकता पालवी फुटते त्याला. कोवळी कोवळी छान नाजूक. म्हणजे अजून त्याची जगण्याची इच्छा आहे. जस निराश माणसाला आपण खुप एनेर्जेटिक खूप मस्त हसत्या खेळत्या माणसात जाणून बुजून ठेवतो तसं मी त्याला एका कायम फुल देणाऱ्या गुलाबाच्या कुंडीत लावलंय. पण हा हट्ट काही सोडत नाही न फुलण्याचा. कुठे तरी दुखावला गेला असेल. खूप खोल कदाचित मला कळणार हि नाही कधी पण मी जपत राहणार त्याला. त्याची नवी पालवी न चुकता येते तोंपर्यंत त्याला माया करत राहणार. फुल नाही तर नाही पालवी जगण्याची ओढ तर आहे.



53

आयुष्य नेहमीच तुमच्या समोर जे तुम्हाला कठीण वाटतं अशीच परिस्थिती आणून उभी करत. आणि मग सुरु होतो झगडा स्वतःचा स्वतःशी स्वतःच्या मनाशी.  कधी स्वप्नातही वाटत नसतं अशी परिस्थिती समोर येऊन उभी राहिली कि माझ्या सारखी सामान्य माणसं गडबडून जातात,  अनुभव, वयाने येणार शहाणपण वगैरे सगळं ठीक तरी ही आलेल्या परिस्थिशी जुळवून घेताना जीव मेटाकुटीला येतो. मेंदूला सगळं चित्र क्लिअर असतं, पण हे जे मन आहे ते सगळा घोळ घालत. आणि मग मन आणि मेंदू मध्ये आपली ओढाताण सुरु होते. जिंकणार परिस्थितीच असते आपला उगाच लढा सुरु असतो. नियतीने सगळं सगळं ठरवलेलं असतं, आपल्याला वाटत आपण बदलू शकू हे, आणि त्यासाठी तन, मन, धन पणाला लावून लढतो परिस्थिती जवळ.

जितकं लवकर हरू आपण या लढ्यात तेवढा लवकर त्रास संपतो, पण सामान्य असलो तरी चिवट असतो आपण माणसं. देवाला हि वेठीला धरतो हे असंच झालं पाहिजे म्हणून, पण तो कधी येतो का मदतीला? मग आपण म्हणायचं त्यांनी जे आपल्यासाठी निवडलं आहे तेच आपल्यासाठी योग्य आहे. आणि समाधान करून घ्यायचे. समजूत घालत राहायचं मनाची,  आणि छान जगत राहायचं.



54

कुठेही प्रवासाला जायचं असेल तर माझा प्रेफ्ररन्स रात्री झोपायला मुक्कामाच्या ठिकाणी पोहोचण्याच्या जास्त असतो. म्हणजे रात्री शांत झोप काढून सकाळी फ्रेश काम सुरु करता येत. पण आज मात्र सकाळी लवकर उठून अर्धी झोप झालेली असताना उठून गाडीत बसलो, त्यामुळे खूप गप्पा वगैरे मारायचा मुड नव्हता. त्यामुळे रेडिओ सुरु करून खिडकीतून बाहेर पाहत प्रवास सुरु झाला. आरटीओ च्या काळ्या काचा नको या नियमा मुळे बाहेरच कसं सगळं स्वच्छ दिसत. तर असा प्रवास सुरु झाला आणि वाटेत अनेक झाड शेतं दिसत होती. अनेक माणसं हि दिसत होती. पण लक्ष वेधून घेतलं एका झाडांनी. एक छान डवरलेलं, पानांनी  आणि चिंचांनी लगडलेले एक चिंचेचं झाड दिसलं. छान गोल,  नीटस, अगदी देखणं दिसत होतं ते. आपलं नेहमी असंच होत जे सुंदर नीटस असेल त्याकडेच आपलं आधी लक्ष जात. आपल्या आजूबाजूला हि अशी अनेक माणसं असतात. काही चिंचेच्या या झाडा सारखी तर काही वेडी वाकडी वाढलेल्या झाडांसारखी. सगळ्या झाडांचा रंग एकच हिरवा. चैतन्याचा, समृद्धीचा. पण आकार, पानांचे प्रकार वेगवेगळे. हिरवंगार झाड पाहिलं की कायम छानच वाटत आपल्याला. उजाड झाड कुणालाच आवडत नाही.

तसं च काहीसं माणसंच असावं. छान सगळ्यांना सावली धरणारी माणसं सगळ्यांनाच हवी हवी शी असतात. सगळ्यांना सांभाळून घेणारी, वेळेला उपयोगी पडणारी, ती माणसं सगळ्यांना प्रिय असतात. पण असा कधी विचार करतो का आपण, कि जशी उजाड झालेली झाड हि कधी तरी बहरलेली असतीलच. त्यांनी ही अनेकांना सावली दिली असेल. भुकेल्याला फळ दिल असेल. आणि असं काही तरी झालं असेल की त्यांनी बहरुन येण सोडून दिलं असेल. कुठे तरी त्याला न भरून येणारी जखम झाली असेल. आपल्या हि आसपास अशी खूप माणसं असतात. जी अशी उजाड झाडा सारखी असतात. त्यांचा सावलीसाठी सुद्धा उपयोग नाही म्हणून एकाकी पडलेली असतात. आता आपण त्यांना फुलायला जगायला मदत करायला हवी. पुन्हा बहरुन यायला मदत करायला हवी.



55

घरच्यांचा विरोध त्या नंतर केलं गेलेलं लग्न, मग फॅमिली जॉईंट असो किंवा नवरा बायको दोघंच राहात असतील तरी,  नवरा खरा सुखावतो ते त्याच्या बायकोला सगळ्यांनी मना पासून स्वीकारल्या नंतरच. म्हणजे आपल्या बायको शिवाय कोणाचं हि घरात पान हलत नाही हे सांगताना तो स्वतःला जगातला सगळ्यात श्रीमंत पुरुष समजत असतो. म्हणजे त्या मुलीला सुद्धा आपल्याला सगळ्यानी स्वीकारलंय याचा आनंद होत नाही एवढा आनंद नवऱ्याला होतो.

दाखवत नसतील पुरुष पण नवऱ्याला बायको नीट घरात रुळे पर्यंत टेन्शन असतंच. काळजी असतेच. आपल्या एकट्याच्या भरवश्यावर तीच सगळं घर दार, माणसं सोडून आलेली ती तिला आपल्या घरात कोणताही त्रास होऊ नये, ती दुखावली जाऊ नये, म्हणून तो काळजी घेत असतो. फक्त मुलाची आई हे समजून घेणारी नसेल तर बिचारा फसतो.  ती घुसमट मग तो व्यक्त हि करू शकत नाही. कारण नवीन आलेल्या बायको जवळ तो आई बद्दल सांगू शकत नाही कारण तिच्या बद्दल बायकोचा गैरसमज होऊ नये आणि उगाच मनात अढी राहू नये म्हणून. प्रयत्न सगळं घर सावरण्याचा असतो त्याचा. त्यामुळे समजून घेऊ आपल्या नवऱ्याला. आणि सुखी राहूया.




56

खरं तर हा बदल कधी पासून सुरु झाला हे सांगता नाही येणार मला, पण लक्षात मात्र एवढ्यातच आला आणि सुखी जीवनाची गुरुकिल्ली सापडली असं वाटू लागलं. हल्ली कोणी कसं हि वागलं आपल्या जवळ तरी ते विसरून जाता यायला लागलं आणि त्यामुळे मनात विचार करून जळत राहणं संपलं. समोरचा माणूस अगदी जवळचा हि असू शकतो तरी ही तिथला संवाद तिथेच संपवून शांत बसणं जमू लागलंय. त्यामुळे वाद न होता संवाद सुरु राहतो. नाही पटलं देते सोडून. पुर्वी हे असं जमत नव्हतं.

मला तरी हा बदल चांगला वाटतोय. तुम्हाला काय वाटत?





57.

कधी तरी विचित्र प्रकारची घुसमट होते मनाची, जी तुम्ही शब्दात हि व्यक्त करू शकत नाही आणि समोरच्याला सांगून हि तो समजू शकत नाही. हे होत ते फक्त जवळच्या नात्यां मध्ये. हि अवस्था खूप वाईट. यातून तुमचं तुम्हालाच बाहेर पडाव लागत. पराकोटीचा दुरावा मनात आल्या नंतर पुन्हा मनातल्या विचारांच्या लाटा पूर्णपणे शांत हि नाही होत. आपण अगदी नाईलाजाने एखादा निर्णय घेतो आणि तो समोरच्या व्यक्तीला स्वतःचा अपमान, समाजातली मानहानी, असं सगळं वाटून आपल्या मुळे एखादी व्यक्ती दुखावली गेली तर त्याचा बदला म्हणून दुप्पट वेगानी घाव घातला जातो उलट आपल्यावर. आणि नातं छिन्न विछिन्न अवस्थेत पडून राहत. कदाचित काही काळानी पुन्हा नातं जोडायचा विखुरलेलं नातं जोडण्याचा प्रयत्न केला जातो. पण दोन व्यक्ती पैकी एकीने प्रेम माया नसून स्वार्थासाठी नातं जोडायचा प्रयत्न केलाय हे दुसऱ्या व्यक्तीला समजलं कि ज्या वेदना होतात त्या कशाही बरोबर तोलू शकत नाही आपण.




58

खरतर आता तीच आणि त्याच लाईफ फक्त विकेंड पुरतच उरलंय. बाकीचे सगळे दिवस आपण एका आखून दिलेल्या चाकोरीत डोळे बांधून फिरत राहतो. डोळे खरं तर उघडे असतात पण चाकोरी सोडून त्यांना दुसरं काही पाहण्याचं स्वातंत्र्यं नसत. शुक्रवारी रात्री घरी पोचल्या नंतर शनिवार सुट्टी म्हणून जरा निवांत उठतो, मग काही तरी स्पेशल ब्रेकफास्ट करून खायला घालायचं असतं मला तुम्हाला, ब्रेकफास्ट म्हणजे ब्रंच होत ते. त्यात दोघं नोकरी करणार असतील तर आठवड्याची कामांची लिस्ट तयार असते, ती करण्यात दिवस जातो, संध्याकाळी बाहेरच काही तरी खाण होत, मुलांची काही तरी स्पेशल डिमांड असते, ती पूर्ण करायची असते. मित्र मैत्रिणी नातेवाईक सगळं सगळं हे या 2 दिवसात बसवायचं असतं. माणसं

हवी असतात आपल्याला पण मग त्यासाठी काही जबाबदाऱ्या हि घ्याव्या लागतात.

पण हेच स्त्री जर पूर्णवेळ घर पाहणारी असेल तर मग ठीक, चित्र वेगळं असतं.

ती तशी हि घरीच म्हणजे न सांगता सगळी काम पूर्ण करत असते. शनिवार असो रविवार ती त्या चक्रात फिरत असते. जिथे अगदी पुरुषांनीच जायला हवं करायला हवं तेवढच काम ती नवऱ्यासाठी ठेवते. शनिवारी नवऱ्याच्या आवडीचं सगळं करायचा बेत असतो. नवरा बाहेर जाऊन काम करतो दमतो, हि काय घरीच असते. तिला कंटाळा येण्याचं स्वातंत्र्य नसत. तिला सुट्टी घेऊन आराम करण्याचीही गरज नसते असं मत असतं. तिनी काम करत राहायचं असतं, सगळ्यांच्या सगळ्या अपेक्षा पूर्ण करायच्या असतात. तिला जे काही सांगायचं असेल बोलायचं असेल ते हि या 2 दिवसातच बोलून घ्यावं लागतं. कारण एरवी नवरा घरी आला की ऑफिस तिथले काम टेन्शन आणि प्रवास या मुळे दमलेला थकलेला असतो. घरी येऊन फ्रेश होऊन जेवण झालं की तो पर्यंत 11 वाजतात, दुसऱ्या दिवशी उठून ऑफिस गाठायचं असतं , तिला हि सगळ्यांच्या सेवेत हजर राहायचं असतं, आणि तिनी सगळं नीटच करायचं असतं कारण ती घरी असते.

म्हणून वाटत आता तीच आणि त्याच लाईफ फक्त वीक एन्ड पुरतच राहिलाय.



59

परवा टीव्ही वर सैराट सिनेमा लागला होता, मला पाहायचा नव्हता, पण एवढा गाजावाजा झालाय त्याचा, त्यामुळे पाहत बसले.

मूल वयात आलं की त्या वया नुसार येणाऱ्या सगळ्या भावना त्याच्या कडे येणारच. विरुद्ध लिंगी आकर्षणही त्यात ओघाने येणार. खरतर आजकाल विरुद्ध लिंगी माणसा बद्दल आकर्षण वाटत यातच समाधान मानण्याची वेळ पालकांवर आली आहे. नाहीतर गे आणि लेस्बियन मुलं मुली खूप वाढत आहेत.

मुलांच्या बाबतीत ठीक आहे, पण मुलगी प्रेमात पडली की डोंगर कोसळतो. लगेच घराण्याचे नाव, अब्रू इज्जत सगळं वेशीला टांगल जात. मग वाद, विसंवाद, मानसिक त्रास सगळं सुरु होत, आणि मग या सगळ्यातून मुलीचं मन अजूनच तिच्या मित्राकडे ओढलं जात. समजून सांगणारे पालक असतील तर मुलगी हे बदल समजून घेऊन बाहेर हि पडते. पण किती असतील असे पालक? अजून हि गावात हा प्रकार आहे, मुलगी प्रेमात पडली म्हणजे आई वडिलांचं तोंड काळ केलं अशा विचारांचे पालक आहेत. तीला समजावून सांगा, आधीच हार्मोनल चेंजेस मुळे तीच तिला हि कळत नसत हे सगळं काय होतंय, त्यात घरात हे असं टॉर्चर असेल तर काय होणार त्या मनाच? मग ते ओढ घेणार ना जिथे मानसिक स्वास्थ लाभत अशा ठिकाणी. एकदा मुलगी 20/22 ची झाली की कळायला लागत तिला , पण तो पर्यंत तिचा आधार बनून तिच्या मागे ठाम उभे राहूया. जग, समाज हा फक्त नाव ठेवायला तत्पर उभा आहे. पण त्याला न घाबरता मुलीला मुलाला त्यांच्या मनाला जपणं आवश्यक वाटत मला. तुम्ही 2 चैनी च्या वस्तू कमी दिल्यात ना मुलीला तरी चालेल पण हा मानसिक आधार समजून घेणं ती आयुष्यभर लक्षात ठेवलं. तिच्यासाठी ते सर्वात मोठं गिफ्ट असेल.

तेव्हा आपल्या या जिवाच्या तुकड्यां जस शारीरिक जपताना तसं मानसिक हि जपा. समजून घेऊया त्यांना. समजून सांगूया त्यांना त्यांची मैत्रीण होऊन समजून घेऊया.



60

आपण एखाद्या माणसात किती गुंतलो आहोत हे खरं तर काही कारणांनी त्या व्यक्ती पासून दूर राहिल्या नंतर जास्त चांगला कळत. माणूस आपल्या समोर असतं त्या वेळी नाही जाणवत हे, कारण गृहीत धरलं जात एकमेकांना, एखादया माणसाचं तुमच्या आयुष्यात नुसतं असणं हे महत्वाच असतंच, पण काही वेळा त्या माणसाचं फिजिकली प्रेझेण्ट असणं हि खूप गरजेचं असतं.



61

सकाळी रोजचा माझा आणि माझ्या लेकीचा संवाद ठरलेला असतो, तिचे केस छान लांब सडक असल्याने वेणी घालायला वेळ लागतो त्यात वेणी असली तरी केसात गुंता होतोच, आज ती म्हणाली मम्मा वेणी असते दिवसभर तरी केसात गुंता कसा होतो ग? मोकळे सोडले तरच होतो ना गुंता?

मी काही तरी सांगून वेणीच काम आटपल, पण डोक्यातून तो प्रश्न काही जात नव्हता.

मनातल्या विचारांचं हि असाच होत. भावनांचंही हे असच होत. किती हि नीट सांभाळून ठेवल्या ना भावना तरी त्यांचाही गुंता होतोच, किती हि विचार मागे सारले तरी ते फिरून फिरून येतातच डोक्यात, मधे कुठे तरी भावनांची म्यानेजमेंट बद्दल वाचलं होतं, पण मला काही फारसं पटलं नाही , अशी भावनांची म्यानेजमेंट करून जगायचं तर मग माणूस म्हणवून घ्यायचं का स्वतःला? सगळंच मेकॅनिकली वागायचं असेल तर मग आपण मशीन होऊन जाऊ, एकदा समोरच्याला ती व्यक्ती तुम्हाला किती आवडते, तुम्ही तिला किती मिस करता, तिची एखादी गोष्ट खूप आवडते, किंवा तिची तुम्हाला किती आठवण येते हे सांगून बघा, तुम्हाला हि खूप छान वाटेल आणि समोरच्यालाही खूप सुखावून जातील हे शब्द. नातं जपायला शब्द हि कधीतरी महत्वाचे असतात.

आयुष्य कुठे आपण प्लॅन करतो तसं नियती जगू देते आपल्याला? आताच क्षण आपला, पुढच्या क्षणी काय समोर असेल ते ही सांगता येत नाही.

त्यामुळे भावनांचा गुंता झाला तर होऊ द्या, त्याना मोकळं करायला आपलं माणूस आपल्या जवळ असलं की तो गुंता हि सुखावहच वाटतो.



62

तना मनाला सुखावणारा हा गारवा आणि धुक्यात लपेटलेली हि सकाळ मला प्रियकारा सारखी वाटतेय. ती भेटीची हुरहूर, तो हवा हवासा नकळता स्पर्श आणि त्या मुळे अंग भर येणारा ती हळवा शहारा. मिठी तर हवी आहे पण कोणी पाहिल याची भीती , म्हणूनच हे धुकं जणू आडोसा करून उभं आहे रस्त्यात.

प्रत्येक सकाळ वेगळी, प्रत्येक दिवसाची सुरुवात वेगळी. चहा करणारे आपणच आणि चहाचा कप हि अगदी ठरलेला तोच असला तरी त्या सोबत मनात घोळणारे विचार काय असतात त्या वर आपल्या पहिल्या चहा ची चव अवलंबून असते. कधी साखरेत घोळलेले, कधी मिठात लोळलेले, कधी प्याशन फ्रुट सारखे आंबट गोड. या अश्या अनेक विचारानं नुसार चहा आणि सकाळची चव असते.

कधी पहाटेच्या स्वप्ना चा विचार, कधी मुलं त्यांच्या शाळा, कधी नातेवाईक, कधी मित्र मैत्रिणी, कधी नवऱ्या जवळ झालेले मतभेद, काही न काही डोक्यात असतंच आपल्या.

उदबत्ती जळताना पाहीली ना? म्हणजे पहिलीच असणार, उदबत्ती जळताना कसं त्या धुराची रेषा सुरुवातीला अगदी सरळ असते, थोडी वर गेली ती रेघ कि मग वारा येईल तशी अनेक वलय तयार होतात त्याची आणि अजून थोडी वर जाऊन ती वलय हि विरून जातात. अगदी उदबत्ती संपे पर्यंत सुरु असतं हे. या विचारांच हि असच असतं, असं मला वाटत, सरळ चाललेले असतात मधेच कुठे तरी गुंततात. आणि काही वेळाने विरून हि जातात.

आपल्या आत एक उदबत्ती अखंड जळत असते, त्या मुळे हे विचार त्यांचा गुंतणारा न विरून जाणारा धूर हे अखंड सुरु असतं.

पण जशी हि उदबत्ती जळत असते तसाच एक मंद ठेवणारा काचेचा आडोसा असणारा दिवा अखंड तेवत असतो आपल्या आत, स्थिर आणि अखंड प्रकाश देणारा, किती हि वारा आला तरी दिशा न बदलणारा. आणि आपण सगळेच हा आपल्या आत तेवत असणारा तो दिवा जपत असतो. कारण चांगलं मन चांगले विचार, चांगले संस्कार यांचं तेल आपण त्याला देत असतो. आणि मग तो हि एक प्रकाश वाट आपल्यासाठी दाखवत असतो.

जपा या दिव्याला, मग आत जळणाऱ्या उदबत्ती मधलं सुद्धा सुवासा सारखं काही तरी चांगलं सापडेल आपल्याला.



63

नात्यात साचलेपण आलं की सगळंच जूनं वाटत, हे सगळ्याच नात्यात होत असाव, पण नवरा बायकोच्या नात्यात जास्त होत असाव, कायमच एकमेकां सोबत राहणारे आपण, नव्या नवलाईचे दिवस संपले कि गृहीत धरायला लागतो एकमेकांना, आणि तिथेच खर तर सुरुवात होत असावी नात्याला सुरकुती पडायला. त्या अनेक सुरकुत्या कधी एका जाड घडीत बदलतात ते कळत हि नाही आपल्याला. आणि मग नात्यात हे तेच तेच पण रटाळ पण येत. नातं साचल्या सारखं वाटत. नियती आपल्याला यातून बाहेर पडायचे संदेश देत असते, पण मी माझं घर माझा संसार यात गुरफलेले आपण मात्र त्या कडे दुर्लक्ष करत असतो.

पूर्वी मुली वर्षातून दोनदा तरी माहेरी 15 दिवस राहायला जात असत. ती पद्धत खूप छान होती. तो हवा हवासा विरह आणि त्या विरह नंतरच एकमेकांना भेटणं, त्याची गम्मत वेगळीच.हे 15 दिवस म्हणजे जीवनातल्या 6 ऋतू मधला शिशिर. आपल्या माणसा पासून दूर राहील कि सगळे रुसवे राग तक्रारी कुठे च्य कुठे निघून जातात.

पुन्हा नव्याने बहारण्यासाठी आयुष्यात शिशिर यावाच लागतो.

शिशिरा सारखं देऊ सगळं जून झटकून

तरच लागेल आपल्याला वसंताची चाहूल. 15 दिवसा नंतर आलेल्या आपण घरात वसंताची चाहूल घेऊन येतो. आणि मग वसंताच्या बहराचे आयुष्य सुगंधित होत.

तुमच्या सगळ्यांच्या आयुष्यात असा वसंत फुलत राहो.



64

या लेखात जे काही मी लिहलं आहे ते पूर्ण पणे माझं मत आहे. प्रत्येक माणूस स्वतंत्र आहे आणि त्यांनी कसं वागावं बोलावं, काय कपडे घालावेत हा पूर्णपणे त्याचा प्रश्न आहे. तरीही मला वाटतंय ते मी इथे लिहिते आहे.

माझ्या लेकीच्या शाळेत वर्षातून एकदा सर्व पालकांना बोलावलं जात. त्यांची ऍथलेटिक मिट असते त्या वेळी. शाळा बोर्डिंग ची असल्याने सर्व पालक आवर्जून या कार्यक्रमाला हजेरी लावतात. अप्पर मिडल क्लास ते श्रीमंत अशा घरातून आलेली हि सगळी मुलं मुली. 75 % सिंगल प्यारेंट असलेली.

आता मुलाच्या किंवा मुलीच्या शाळेत येताना किमान अपेक्षा एवढीच कि नीट जिथे जातोय त्या हिशोबानी कपडे घालून जावेत. विशेषतः स्त्री पालक ज्या येतात त्या एखाद्या रॅम्प वॉक ला आल्या सारख्या छोट्या छोट्या कपड्यात त्याखाली मोठाल्या हिल्स मोकळे सोडलेले केस. अशा अवतारात आलेल्या असतात. छोट्या कपड्यात म्हणजे अगदी शॉर्ट्स पासून मिनी स्कर्ट, आणि वरती टाईट डीप लो गळ्याचे टॉप्स.

खरंतर शाळा एवढी छान आहे कि खरंच चांगले संस्कार मुलांवरती केले जातात. मध्ये असंच काही कामासाठी गेले असता. तिथल्या एक कॅथलिक शिक्षिका स्वतः छान साडी नेसलेल्या होत्या. एक मुलगी घरून सुट्टी हुन परत आली होती. आई चे आणि मुलीचे कपडे स्टाईल प्रमाणेच होते. त्या शिक्षिका त्या मुलीला समजावत होत्या इनफॅक्ट रागावतात होत्या. कि अग शाळेत येताना हे असे कपडे घालून यायचं नाही हे सांगितलं आहे ना? पूर्ण अंगभर कपडे घालून ये. आपल्या शाळेत पुरुष शिक्षक हि आहेत. तुम्ही मुली आता मोठ्या झाला आहेत.


आता हे त्या मुलीने ऐकलं हि असेल, पण तिच्या आई च काय? तिला निदान सेन्स हवा ना कि आपण लेकीच्या शाळेत जाताना शॉर्ट्स घालून जाऊ नये, मी म्हणताच नाही नऊवारी साडी डोक्यावर पदर, किंवा आपली रेगुलर साडी नेसूनच यावं, पण निदान सलवार कुर्ता, जीन्स असा तरी वेष असावा.

पण मला वाटत हल्ली छोटे कपडे घालणं हे मुळी स्टेटस सिम्बॉल वाटतं बायकांना.  प्रत्येक स्त्री हि सुंदर असते. ती सुंदर आहे हे दाखवण्यासाठी अंग प्रदर्शन करण्याची खरंच गरज आहे का?  परवाच एक शेजारची मुलगी प्रचंड तंग टीशर्ट तो हि अगदी पातळ कि ज्यातून तिने आतमध्ये घातलेल्या सगळ्या गोष्टी उठून दिसतील अशी समोरून चालत आली. चालताना रुबाब असा होता, कि शरीराचा तो अवयव फक्त जणू जगात तिच्या कडेच आहे. मला स्त्री असून ते पाहून नजर दुसरीकडे वळवावी लागली.

तुम्हीच शरीराचं प्रदर्शन मांडलं तर बघणारे बघणारच, आणि त्यांच्या त्यांच्या कुवती प्रमाणे कंमेंट हि पास करणारच. त्या वेळी खूप वाईट वाटत मग.

हल्ली सर्वच ठिकाणी स्त्रिया काम करतात. प्रवास करतात, त्यामुळे त्यांना कंफर्टेबल असतील ते कपडे त्यांनी जरूर घातले पाहिजेत. पण काही तरी भान ठेवून. स्वतःच्या शरीराला शोभतील असे, उगाच फॅशन आहे म्हणून काहीही घालाल तर ते तुम्हालाच चांगलं दिसणार नाही. प्रेसेंटेबल आपण असलाच पाहिजे पण त्यासाठी शरीर प्रदर्शन हा पर्याय आहे का? खरंच विचार करा.

किमान जिथे जाता आहेत त्या वातावरणाचा त्या परिस्थितीचा विचार करून तरी कपडे वापरा एवढंच म्हणणं आहे माझं.





65

काल पासून फेसबुकवर एक नविन चँलेंज आलय. ब्लँक अँड व्हाईट फोटो अपलोड करायचे. ते पाहून मनात आलेला विचार शेअर करते.

आपलं आयुष्य ही कितीतरी चॅलेंज समोर ठेवतं. टँग करताना न विचारणार्या मित्रां सारखं. चँलेंजला टँग केल्या नंतरच कळत आपल्याला. इथे रिमूव्ह टँगचा आँप्शन नसतो. जे आहे ते अँक्सेप्टच कराव लागतं. कलरफुल चँलेंज सगळ्यानाच आवडत पण हे ब्लँक अँन्ड व्हाईट नाही आवडत. काही वेळा यात चँलेंज म्हणून माणसांचेही रंग समाेर येतात. कलरफूल माणसं आयुष्य नेहमीच समृद्ध करतात. पण ही ब्लँक व्हाईट माणसं मात्र आयुष्यात खूप काही शिकवून जातात.

जुन्या आठवणी जपण्यासाठी असे ब्लँक अँन्ड व्हाईट फोटो खूप जपून ठेवतो आपण. पण आयुष्यातले ब्लँक अँन्ड व्हाईट क्षण आपण विसरलेलेच चांगले. आयुष्य कलरफूल चिअरफूल ठेवा स्वतःच आणि दुसर्यांचही.



66

दहीहंडी

तू का सुरु केलास हा दहीहंडी चा खेळ

राहिला आहे का रे खरंच त्यात काही मेळ

तू सुरु केलास गोपालां सोबत काही वेळ रमण्यासाठी काही वेळ गंमत करण्यासाठी हा उत्सव पण आज पाहातोयस ना ? उंच उंच मनोरे साचून जीव धोक्यात घातला जातो, पैशाचा हव्यास आणि हा जीव पणाला लावून मिळवलेला पैसा जातो कुठे? एखाद्या बार मध्ये, एखादा कायमचा अपंग झालेला गोविंदा आयुष्य भरासाठी जागेवर बसतो त्या वेळी या मोठ्या मोठ्या थरांच्या हंड्या बांधणारे लोक करतात का रे विचारपूस यांची? घरातला एकुलता एक मिळवणारा माणूस असा जाग्यावर बसला कि त्याच्या घरच्यांची काय अवस्था होत असेल? दे ना रे तू बुद्धी याना, मजेसाठी एकत्र जमून खेळायलाच हवी दहीहंडी पण या एवढ्या उंच उंच हंड्या बांधून स्वतःचा मोठे पण दाखवण्यासाठी तुझ्या सावंगड्यांचा जीव धोक्यात घालणाऱ्याना बुद्धी दे, विज्ञान किती हि पुढे गेलं असलं तरी एकदा माणूस गेला की त्याला पुन्हा जिवंत नाही रे करता येत अजून.एकदा पुन्हा जन्म घे कृष्णा आणि समजावं याना तुझा जन्मोत्सव कसा साजरा करायचा ते.



67

काल 70 वा स्वातंत्र्य दिन साजरा केला आपण. देशाच्या स्वातंत्र्याबद्दल त्यातल्या बदलांबद्दल बोलायला मी तेवढी मोठी नाही, मी एक सामान्य मध्यमवर्गीय गृहिणी आहे. माझं जग म्हणजे माझा संसार, मुलं, मैत्र गण आणि माझे छंद. एवढंच सीमित आहे, सामाजिक बांधिलकी म्हणून करण्या सारख्या गोष्टी असतील त्या मी जरूर आनंदाने करते.

स्वातंत्र्या दिनाच्या पोस्ट खूप आल्या काल. त्यात लग्न झालेल्या लोकांना विश करू नका त्यांना त्रास होईल अशी एक विनोदी पोस्ट हि आली होती.

पण खरंच आपण एवढे स्वातंत्र्य हिरावून घेतले गेलेले असतो का हो? लग्न झालं की एडजेस्टमेंट हि प्रत्येकालाच करावी लागते, दोन वेगळ्या वातावरणातून 2 वेगळ्या फॅमिली तुन आलेली 2 वेगळी माणसं एकत्र येऊन राहतात त्या वेळी अपेक्षित असतं , कि स्वभाव, सवयी ,आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन, अगदी खाण्याच्या सवयी सुद्धा वेगळ्या असणार. पण लग्न म्हणजे मनानी जवळ येणं, एकमेकांना गुण दोषां सह स्वीकारणं, मग यात बंधन येत कुठे? तुमचा जोडीदार 2 दिवस बाहेर गेला तर तुम्ही त्याला न आवडणाऱ्या गोष्टी करता का ? नाही करत, कारण त्याला आवडत नाही तर कस करू किंवा करू नको असा दबाव नसतो कुणाचा, पण मनानी जे नातं जपतो आपण ते मनच आपल्याला ते करु द्यायला तयार नसत.

4 दिवस बायको किंवा नवरा घरा बाहेर असेल तर 2 दिवस त्याला न आवडणारे पदार्थ तुम्ही करून खाल, पण 3 दिवशी मात्र ती व्यक्ती तुम्हाला तुमच्या जवळ हवी असते. मिळालेलं स्वातंत्र्य तुम्ही एन्जॉय करू शकत नाही. कारण मनानी तुम्ही ते बंधन मांडलेलं नसत.

लग्न म्हणजे एक खूप छान धागा जो मनानी मनाशी जोडला गेलेला, एक अतूट बंधन. रक्ताचं नातं नसताना एकत्र येतात दोन व्यक्ती आणि आयुष्यात सुखाचा बहर येतो. एकमेकांचं आयुष्य फुलवलं जात तिथे हे बंधन अन स्वातंत्र्य येतच कुठे?



68

संवाद होण्यासाठी माणूस मनानी जवळ असायला हवं, तासंतास समोर बसून राहिलात तरी संवाद घडेलच असं नाही, प्रत्येक वेळी शब्द लागतात संवादासाठी असही नाही, काही माणसांच्या जवळ किती हि वेळ बोललो तरी नाहीच वाटत पुन्हा त्या व्यक्तीला भेटावं, बोलावं, आणि काही माणसं मात्र एका नजरेतच खुप काही बोलून जातात.

संवाद खूप महत्त्वाचा, समंजस सवांदाची गरज आपल्या प्रत्येकाला असते. मग तो कधी नवऱ्या जवळ घडतो, कधी मुलांच्या जवळ, कधी मित्र मैत्रिणी जवळ तर कधी घरातल्या आरश्या जवळ. म्हणजेच स्वतःचा स्वतः जवळ. हा असा स्वतः जवळ संवाद घडायला सुरुवात झाली की लाईफ एकदम हलकफुलक होत, या संवादात ना आवाजाचा त्रास न लोकां चा डिस्टरबंस. ना कुणा ला वेळ आहे का पाहायची गरज.

स्वतःची सोबत एन्जॉय करूया.





69

पाण्यासारखा प्रवाही मन काही होत नाही

कुठे तरी अडकत, कुठे तरी अडवलं जात
आणि मग काही न काही साठत जात तळाशी.

हजार वेळा ठरवलं की सोडून द्यायचं सगळं.जेजे होईल ते ते स्वस्थ मनानी स्वीकारायचं. पण  अचानक झालेले बदल ढवळून काढतोय तळ. आणि मग साचलेलं सार काहीवेळासाठी तरंगत राहत मनावर. तुरटी फिरवल्या सारखा एखादा विचार पुन्हा स्वच्छ करतो मन. पण ते सार तात्पुरतं असतं. कारण तुरटीने पाणी फक्त स्वच्छ दिसत. त्यातले जंतू विषाणू तसेच असतात. तसच मनाच्या तळाशी विचार साचलेलं असतातच.



70

खूपदा अशी माणसं पहाते जी खूप आनंद आणि खूप दुःखात हि स्वतःला सावरून असतात, याला रुक्षपणा म्हणायचं कि प्रगल्भता हा प्रश्न मला ही पडतो. मी पाहिलेली अशी ही माणसं एक तर खूप पावसाळे पाहिलेली होती किंवा आयुष्यानी ज्यांना खूप काही शिकवलेली होती. प्रगल्भता किंवा रुक्षपणा नाही वाटत मला हा. आयुष्यानी शिकवलेलं शहाणपण वाटत. जिथे आणि ज्या परिस्थिरीत आहात तिथं खंबीर उभी राहण्याची जबरदस्त ताकद असलेली असतात अशी माणसं.





71

अखंड तुझ्या पोटातुन येणाऱ्या लाटा हे तुझ्या अस्थिरतरतेचे प्रतीक मानू कि, तुझ्या आतल्या ज्वालामुखीचा उद्रेक समजू?

का माझ्या मनावर उठणाऱ्या विचारांच्या तरंगा सारखा तुही अविरत विचार करत असतोस?

तुझ्या सारखं विशाल अन निर्विकार होता येत नाही मला. तुला ना कुण्याच्या येण्याचा आनंद ना कुणाच्या जाण्याचं दुःख. तू तुझं आपलं भरती ओहोटीच्या चक्रात फिरत असतोस. अखंड अविरत. सागरा तुझ्या सारखं होता यायला हवं मला.



72

सुखं दुःख, विरह सगळ्या भावना, यांची तीव्रता कमी होण्यासाठी वेळ हा लागतोच. काहींना कमी काहींना अधिक. पण कमी होतेच वाटण्याची तीव्रता. पण लोक वाट पाहात नाहीत. तुम्ही नॉर्मलला येण्याची. प्रत्येक गोष्टीत झटपट रिझल्ट हवे असतात त्यांना. जणू माणूस म्हणजे मशिनच आहे. त्याचा त्याचा वेळ त्याला घेऊ द्या. एकदम 10 व्या मजल्यावरून 1 ल्या मजल्यावर आणून ठेवायची घाई नका करू. प्रत्येकाला समजत असतं सगळं काही उमजत असतं. फक्त त्याला वेळ हवा असतो. राहू दे काही काळ त्याच्या विश्वात त्याला. अनुभवू दे सुख दुःख विरह वेदना. शेवटी येणारच आहे तो तुमच्या आमच्या सारखा सहनशील माणूस बनून जगासमोर.



73

तुझी सवय होण्या आधीच

आत्ताच्या आत्ता मला बोलायचं आहे तुझ्याशी खूप आठवण येतेय म्हणून, अशी अनिवार इच्छा मनात दाटून येण्या आधीच

हा सगळा भावनांचा पसारा आवरायला हवा रे.

पण मग ती विरहाची वेदना भूल पाडते, खोटे राग रुसवे, लुटुपुटूची भांडण, त्या वेळी हवी हवीशी वाटतात. मग तुझं समजून काढणं सगळं सगळं जसं स्वप्नात पाहिलेलं असतं तसंच, आणि मग गुंतत राहतो पाय गुंत्यात.

प्रेमात पडावं की पडू नये असे ऑपशन देतच नाही प्रेम.

गुंता वाढत गेला की कळतं प्रेमातच पडलो आहोत आपण हे.

प्रेमाच्या आणि मैत्रीच्या अंधुक सीमारेषे वरून चालताना दमछाक होते दोघांची, मैत्री मैत्री म्हटलं तरी ओढ असतेच एकमेकांच्या सोबतीची, सहवासाची, सहवास म्हणजे शारीरिक समागमच असा अर्थ अपेक्षित नाहीच इथे, पण तू समजावताना, हलकेच थोपटलेला हात, किंवा कपाळावर मायेने केलेला तूझ्या ओठांचा स्पर्श, हे त्या त्या क्षणी हवंस वाटत.

कारण तो स्पर्श एका पुरुषाचा किंवा स्त्री चा नसतो, फक्त माणसाने माणसाला केलेला स्पर्श असतो तो.

त्यात ना वासना असते ना कसली अभिलाषा.

हे असंच नातं तर अपेक्षित असतं प्रत्येक स्त्रीला मित्राकडून. कृष्ण म्हणून एक मित्र आयुष्यात असावा.

# कसं वाटलं पुस्तक मित्रांनो?

फुकट असलं तरी दर्जेदार आहे ना?

काही लोकांचा असा समज आहे की जे फुकट मिळतं ते कमी दर्जाचं असेल. पण तसं नसतं. आपल्याला आपले आईवडील मिळतात ना की ते आपण विकत घेतो? आणि त्यांचे संस्कार? आणि आपला देश आपलं राष्ट्रीयत्व? अगदी आपल्या आजूबाजूच्या हवेतला ऑक्सिजनही फुकटच मिळतो ना. आणि हा मौल्यवान मनुष्यजन्मही फुकटच मिळाला की आपल्याला!

तेव्हा मित्रांनो जे जे फुकट ते ते फ़ालतू असा समज असलेल्या लोकांना एकदा ई साहित्यच्या साइटवर आणा. ई साहित्यची पुस्तकं वाचायला द्या. तुम्ही जे पेराल तेच उगवेल. जर तुम्ही समाजात चांगली मूल्यं पेराल तर तुम्हालाही या समाजात चांगली वागणूक मिळेल. समाज म्हणजे आपणच की. निदान आपल्या आजूबाजूचा समाज तरी मूल्यप्रधान करुया.सगळं काही पैशानंच करायचा अट्टाहास नाही चालणार.

चला तर मित्रांनो, एक भव्य चळवळ उभारुया. यात प्रत्येकाने आपला सहभाग घेतला तर हा बाराकोटींचा महाराष्ट्र जगातला सर्वोत्कृष्ट अभिरुचीपूर्ण वाचकांचा प्रदेश बनायला वेळ लागणार नाही.

टीम ई साहित्य

esahity@gmail.com

www.esahity.com

एक प्रसन्न अनुभव